रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर


◆ वर्ष १८ ◆ अंक २८६
www.ramprahar.com

◆ मंगळवार, ५ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



मुंबई : पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरी येथील दणदणीत विजयानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील भाजप महाराष्ट्र प्रदेश मुख्यालयाच्या प्रांगणात विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मंत्री मंगलप्रभात लोढा, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

आजचा ऐतिहासिक दिवस आहे. प. बंगालच्या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास दाखवला व बंगालमध्ये महापरिवर्तन करून दाखवले. दोन तृतीयांश संख्याबळ भाजपला मिळाले. बंगाल, आसाम व पुद्दुचेरीमधील विजय मोदींवरच्या विश्वासाचा विजय आहे. बंगालचे परिवर्तन केवळ पंतप्रधान मोदीच करू शकतात, हे सिद्ध झाले.
–देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री




# भाजपचा पंचरंगी विजय

## प. बंगालमध्ये सत्तांतर, आसाम–पुद्दुचेरीत हॅट्ट्रिक, तामिळनाडूत किंगमेकर, तर केरळात एण्ट्री!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपप्रणित एनडीएने पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक यश मिळवले आहे. निवडणूक आयोगाच्या अधिकृत कलांनुसार पाचपैकी तीन राज्यांत एनडीएला स्पष्ट बहुमत, एका राज्यात किंगमेकरची भूमिका आणि एका राज्यात एनडीएने आजवरची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली आहे.

पश्चिम बंगालमध्ये १५ वर्षांची ममता बॅनर्जींची सत्ता उलथवून भाजपने सत्तांतर घडवले आहे. कलांनुसार भाजप १८३ जागांवर आघाडीवर असून बहुमताचा १४८चा आकडा ३५ जागांनी पार केला आहे. २०२१मध्ये २१५ जागा जिंकणारी तृणमूल काँग्रेस ११५ जागांवर घसरली आहे.

आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखाली एनडीएने हॅट्ट्रिक साधली आहे. एनडीए ९८ जागांवर आघाडीवर असून २०२१च्या तुलनेत २५ जागांचा फायदा झाला आहे. काँग्रेस आघाडी २६ जागांवर मर्यादित, तर एआययुडीएफला फक्त दोन जागा मिळाल्याचे दिसत आहेत.

केंद्रशासित प्रदेश पुद्दुचेरीत एआयएनआरसी–BJP–AIADMK युतीने २२ जागांवर आघाडी घेत बहुमताचा १६चा आकडा पार केला आहे. काँग्रेस आघाडी सहा जागांवर आहे. तामिळनाडूत TVK १०६ जागांवर सर्वात मोठा पक्ष ठरला, पण सत्तेची किल्ली भाजपकडे आहे. (पान २..)

### जनशक्तीचा विजय –पंतप्रधान नरेंद्र मोदी



**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरीतील ऐतिहासिक विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी सायंकाळी दिल्लीतील भाजप मुख्यालयात कार्यकर्त्यांना संबोधित केले. भाजप मुख्यालयात कार्यकर्त्यांनी ढोल–ताशांच्या गजरात जल्लोष केला. पंतप्रधानांचे पुष्पवृष्टीसह भव्य स्वागत करण्यात आले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, बंगालमध्ये २८ वर्षांनंतर भाजपचे सरकार येणार हे स्पष्ट झाले आहे.



## पनवेलमध्ये भाजपचा आनंदोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पश्चिम बंगाल, आसाम, पुडुचेरीच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करीत एकहाती सत्ता मिळवली. हा आनंद देशभर साजरा करण्यात आला. त्या अनुषंगाने भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये फटाक्यांची आतषबाजी आणि मिठाई वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

पश्चिम बंगाल, आसाम, पुडुचेरी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करीत स्पष्ट बहुमताने सत्ता स्थापन करण्याच्या पार्श्वभूमीवर देशभर आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विजयाचा जल्लोष पनवेल शहरातही उत्साहात साजरा करण्यात आला. भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली पनवेल येथे फटाक्यांची आतषबाजी करून आणि मिठाई वाटून कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंद व्यक्त केला. यावेळी "भारत माता की जय" आणि "भाजपचा विजय असो" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते प्रकाश बिनेदार, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, उपाध्यक्ष गणेश कडू, महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, शहर अध्यक्ष नगरसेवक सुमित झुंझारराव, (पान २..)

# बारामतीमध्ये सुनेत्रा पवारांचा विक्रमी विजय

**पुणे : प्रतिनिधी**



बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांनी तब्बल २ लाख १८ हजार ९३० मतांच्या विक्रमी फरकाने विजय मिळवत राजकीय वर्तुळात नवा इतिहास घडवला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत बारामतीच्या मतदारांनी पुन्हा एकदा पवार कुटुंबावर विश्वास दाखवला आहे. बारामतीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २०१९ मध्ये केलेला मताधिक्याचा विक्रम उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मोडला आहे, विक्रमी मतांनी सुनेत्रा पवार यांचा बारामतीच्या पोटनिवडणुकीत विजय झाला आहे.

या विजयासह सुनेत्रा पवार बारामतीच्या दुसऱ्या महिला आमदार ठरल्या आहेत. तब्बल ६४ वर्षांनंतर पुन्हा एकदा महिला नेतृत्व बारामतीच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आले आहे.

अजित पवार यांनीही या मतदारसंघातून अनेकदा विजय मिळवत मजबूत पकड सिद्ध केली होती. त्यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी मिळवलेला प्रचंड मताधिक्याचा विजय हा सहानुभूतीसह संघटनशक्ती आणि स्थानिक विकासाच्या मुद्द्यांचा परिणाम मानला जात आहे. आता सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर बारामतीच्या विकासाची जबाबदारी आली असून, आगामी काळात त्या कोणते निर्णय घेतात आणि मतदारांच्या अपेक्षा कशा पूर्ण करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राहुरीत भाजपचे अक्षय कर्डिले विजयी

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**




राहुरी विधानसभेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले १ लाख १२ हजार ५८७ इतक्या विक्रमी मतांनी विजयी झाले. इतर सर्व ६ उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त झाल्या. विजय जाहीर होताच भाजप कार्यकर्त्यांनी मतदान केंद्राबाहेर गुलाल उधळून जल्लोष केला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे, आमदार संग्राम जगताप, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व अनिल मोहिते यांच्या उपस्थितीत विजयी उमेदवार अक्षय कर्डिले यांनी निवडणूक निर्णय अधिकारी अनुपकुमार यादव यांच्याकडून प्रमाणपत्र स्वीकारले.

# थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमाचा आढावा

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामाजिक कार्यक्रमासंदर्भातील अंतिम नियोजन आढावा बैठक सोमवारी (दि. ४) माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत उलवे नोड येथे झाली.



उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे झालेल्या या बैठकीस रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव एस.टी. गडदे, संचालक संजय भगत, भाऊशेठ पाटील, वसंत पाटील, पं. स.चे उपसभापती भूपेंद्र पाटील, जि.प. सदस्य निकिता खारकर, पं.स. सदस्य जिज्ञासा कोळी, नगरसेवक दशरथ म्हात्रे, विकास घरत, जयंत भगत, विश्वनाथ कोळी, जयवंत देशमुख, भार्गव ठाकूर, जयवंत देशमुख, अनिल देशमुख, सुहास भगत, योगिता भगत, ॲड. राहुल घरत यांच्यासह श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून समितीनुसार जबाबदारीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. विविध समित्यांमार्फत सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांची माहिती घेऊन त्या वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# पंढरपूरचा समग्र विकास ३० महिन्यांत पूर्ण करा!

## मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश | ४१५०.४६ कोटींच्या विकास आराखड्यास मान्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत ४१५०.४६ कोटींच्या सर्वसमावेशक आराखड्यास मान्यता देण्यात आली. पंढरपूर हे राज्यातील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकास आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात. पुढील ५० वर्षांचा विचार करुन या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणारी विकासकामे येत्या ३० महिन्यांत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले आहेत.



मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान अवताडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक तीर्थक्षेत्र आहे. भाविकांची सातत्याने वाढणारी संख्या, रस्ते, वाहतूक व अन्य संबंधित बाबी लक्षात घेता पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसराच्या समग्र व नियोजित विकासाची कामे वेगाने हाती घेण्यात यावीत.

भाविकांना स्वच्छ, गर्दीमुक्त, सुरक्षित व आध्यात्मिकदृष्ट्या समाधानकारक अनुभव मिळावा हा विचार करून विकासकामे दर्जेदार, शाश्वत व भविष्याभिमुख पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. बाधित निवासी व व्यावसायिक मालमत्ताधारक तसेच भाडेकरूंना योग्य मोबदला देण्यात यावा. भूसंपादनासाठी निधीही उपलब्ध करून द्यावा. निधीअभावी कोणतेही काम अपूर्ण राहू नये, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

सस्नेह निमंत्रण

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित



स्व. जनार्दन भगत साहेब
यांची ३८वी पुण्यतिथी कार्यक्रम

निमित्ताने शिक्षण, क्रिडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था व व्यक्तींचा पारितोषिक वितरण समारंभ
तसेच पनवेल तालुकास्तरीय
"स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६"

गुरूवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ठिक ०६.०० वाजता
ठिकाण : रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं. ६, सेक्टर १२, उलवे नोड

स.न.वि.वि

आपणांस कळविण्यात येते की, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ठीक ०६.०० वाजता "स्व. जनार्दन आत्माराम भगत साहेब" यांची ३८ वी पुण्यतिथी कार्यक्रम रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं.६, सेक्टर १२, उलवे नोड, नवी मुंबई येथे आयोजित केला असून सदर कार्यक्रमासाठी खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

समारंभ अध्यक्ष
मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब
माजी खासदार व चेअरमन ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

प्रमुख पाहुणे
मा. श्री. प्रशांत ठाकूर — आमदार – पनवेल विधानसभा तथा अध्यक्ष, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
मा. श्री. महेश बालदी — आमदार – उरण विधानसभा
मा. श्री. नितीन पाटील — महापौर, पनवेल महानगरपालिका
मा. श्री. मंगेश वाकडीकर — अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद
मा. श्री. जे. एम. म्हात्रे — माजी नगराध्यक्ष, पनवेल
मा. श्री. अविनाश कोळी — अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भाजपा
मा. श्री. महेंद्र घरत — अध्यक्ष, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी
मा. श्री. अरूणशेठ भगत — अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल तथा अध्यक्ष, पनवेल तालुका भारतीय जनता पार्टी
मा. श्री. वाय. टी. देशमुख — उप कार्याध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. सौ. प्रमिला पाटील — उपमहापौर, पनवेल महानगरपालिका
मा. सौ. रंजना वासकर — सभापती, पंचायत समिती पनवेल
मा. श्री. भुपेंद्र पाटील — उपसभापती, पंचायत समिती पनवेल
मा. श्री. अनिल पांडूरंग भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. श्री. प्रकाश जनार्दन भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. श्री. संजय जनार्दन भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल संचालक, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ,पनवेल
मा. श्री. वसंत हरी पाटील — सभासद, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

रायगड आणि नवी मुंबईमधील तमाम बंधू–भगिनींचे प्रेरणास्त्रोत असणाऱ्या स्वर्गीय जनार्दन आत्मराम भगत साहेबांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण

आपले स्नेहांकित
श्री. परेश ठाकूर — सचिव, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल, कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल, मा. गटनेते, पनवेल महानगरपालिका, पनवेल
प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे — सचिव, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि सर्व कर्मचारी वृंद श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल

# सर्वसामान्य माणूस हाच आपला विठ्ठल; त्याच्या सेवेसाठीच 'टेक-वारी'!- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाचा अंतिम उद्देश हा सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ करणे आहे. सर्वसामान्य माणूस हाच आपला 'विठ्ठल' असून त्याच्या सेवेसाठीच टेक वारी आहे. केवळ तंत्रज्ञान नव्हे तर मानवी संवेदना, मानसिक आरोग्य, आत्मपरीक्षण "आर्ट ऑफ हँडलिंग क्रिटिसिझम" विषयही प्रशासनासाठी महत्त्वाचा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या 'टेक वारी' उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात नागरिक-केंद्रित प्रशासनाचा वेगवान रोडमॅप राबविला जात असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शासन अधिक कार्यक्षम आणि सुलभ करण्यावर भर दिला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगणात सामान्य प्रशासन विभागातर्फे आयोजित 'टेक-वारी २.०' अंतर्गत 'महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, केंद्र सरकारच्या क्षमता बांधणी आयोगाच्या अध्यक्ष राधा चौहान, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा उपस्थित होते. कार्यक्रमास विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




मुख्यमंत्री म्हणाले की, प्रशासनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करण्यासाठी 'टेक वारी' हा उपक्रम आहे. 'टेक वारी' ही संकल्पना वारीच्या सातत्यपूर्ण परंपरेप्रमाणेच प्रेरणादायी आहे. जसे वारकरी कोणत्याही परिस्थितीत पंढरपूरची वारी चुकवत नाहीत, तसेच आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात सातत्याने शिकणे अत्यावश्यक आहे. तंत्रज्ञान दररोज बदलत असून, ते आपण जर स्वीकारले नाही तर व्यक्ती काळाच्या ओघात मागे पडू शकतात. अक्षरज्ञानापासून इंटरनेटपर्यंत साक्षरतेची व्याख्या विकसित झाली असून आता ती एआयपर्यंत पोहोचली आहे. 'ज्याला एआय समजते आणि वापरता येते, तोच खऱ्या अर्थाने आज साक्षर आहे' असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआयमुळे नोकरीच्या स्वरूपात मोठे बदल होणार असून, पुढील एक हजार दिवसात ८० ते ९० टक्के कामकाजाचे स्वरूप बदलू शकते, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.तंत्रज्ञानाला घाबरण्याऐवजी ते स्वीकारण्याची गरज अधोरेखित करताना त्यांनी संगणक क्रांतीचे उदाहरण दिले. संगणकामुळे कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढली, तसेच मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल झाले.'आयगॉट'प्लॅटफॉर्मद्वारे राज्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण घेतल्याचा उल्लेख करत त्यांनी अभिमान व्यक्त केला. विशेषतः एआय आणि आधुनिक तंत्रज्ञान विषयांबाबत अधिकाऱ्यांनी दाखवलेली उत्सुकता ही सकारात्मक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध विभागांनी एआय आणि ब्लॉकचेनसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही क्षमता योग्य प्रकारे वापरली, तर महाराष्ट्र इतर राज्यांना मार्गदर्शन करू शकणारी कन्सल्टिंग क्षमता विकसित करू शकतो. एआय एजंट "वासुदेव" अत्यंत कार्यक्षम पद्धतीने काम करतात, त्यामुळे भविष्यात त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी आपल्यालाही स्वतःची कौशल्ये सातत्याने अद्ययावत ठेवावी लागतील.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सतत शिकत राहणे आवश्यक आहे. "'टेक-वारी २.०"मधून केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे, तर आत्मविकास, कार्यक्षमता आणि आधुनिक दृष्टिकोन विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.वारकऱ्यांची पंढरपूरकडे जाणारी वारी जशी शिस्त, श्रद्धा आणि एकात्मतेचे प्रतीक आहे, त्याचप्रमाणे "टेक वारी" ही प्रशासनाची तंत्रज्ञानाकडे वाटचाल दर्शवणारी चळवळ आहे. भविष्यात नागरिक-केंद्रित आणि सक्षम शासन घडवण्यासाठी ही वारी महत्त्वाची आहे.

## तळा बसस्थानकाच्या स्वच्छतागृहाचे काम पूर्ण न झाल्याने महिलांचे हाल



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्याच्या बस स्थानकाच्या स्वच्छता गृहांचे काम कुर्मगतीने चालु असल्याने गेल्या वर्षभरापासून महिलांना मोठ्या समस्याना सामोरे जावे लागत आहे.यामुळे महिला वर्गातून नाराजी व्यक्त होताना पहावयास मिळत आहे.

सदर बसस्थानकाच्या कामाचे भुमीपूजन १४ ऑक्टोबर २०२४ रोजी ऑनलाइन पध्दतीने झाले होते व बसस्थानकाच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात ७ जुलै रोजी झाली होती मात्र आज पर्यंत हे काम पूर्ण का झाले नाही असा ही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शासनाने महिलाना तिकीटामधे ५०% सुट दिल्या पासून एसटी ने प्रवास करण्याचे महिलांचे प्रमाण वाढले आहे.नियमित बसस्थानकात महिलांची एसटीने जाण्यासाठी गर्दी असते.यावेळी एखाद्या महिलेला लघुशंकाला जायच झाल्यास कोठे जावे असा प्रश्न महिलांसमोर निर्माण होऊन महिलांना यामुळे मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

त्यामुळे हे काम लवकरात लवकर ठेकेदाराने पुर्ण करावे व याकडे अधिकारी वर्गाने लक्ष घालून हे काम दर्जेदार करून घ्यावे अशी अपेक्षा केली जात आहे.तसेच उन्हाळ्याची मुलांना सुट्टी पडल्यापासून मुले आपल्या गावाकडे आली आहेत.लग्न सराईही असल्याने एसटीला जाणे- येणे करणारे प्रवासी वाढत असल्याचे पहावयास मिळत असून महिला व प्रवाशांच्या दृष्टीने स्वच्छता गृहाचे काम त्वरित करावे अशी अपेक्षा सर्वस्तरांतून होत आहे.

# पेणमध्ये तालुकास्तरीय भव्य कृषी मेळावा ; १५ प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान

**पेण : रामप्रहर वृत्त**

खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे धडे देण्यासाठी पंचायत समिती पेण व तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार ४ मे २०२६ रोजी आगरी समाज हॉल, पेण येथे 'तालुका स्तरीय भव्य कृषी मेळावा' उत्साहात संपन्न झाला.

यावेळी "शेतकरी हा देशाचा कणा आणि जगाचा पोशिंदा आहे. जय जवान, जय किसान या उक्तीप्रमाणे सैनिकासोबत किसानही टिकला पाहिजे. भारत जगात अन्नधान्य निर्यातीत पहिल्या पाच देशांत आहे. देश स्वयंपूर्ण करायचा असेल तर शेतीकडे लक्ष द्यावे लागेल तसेच कृषी व पशुसंवर्धन विभागा बरोबरच शेतकऱ्यांच्या विकासात अमूलाग्रह बदल करणार असे जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील यांनी ठामपणे सांगितले.

प्रगत शेतकऱ्यांच्या कामाचे कौतुक करताना ते म्हणाले, "सोयीसुविधा नसतानाही १९९० पासून त्यांनी शेती फुलवली. मी स्वतःला 'शेतकरी सभापती' समजतो आणि शेतकऱ्यांच्या पाठीमागे ठाम उभा आहे." कृषी खात्याला टार्गेट देताना त्यांनी "तालुक्यात किमान ५०० नवीन प्रगत शेतकरी तयार करणे ही काळाची गरज आहे," असे स्पष्ट केले.



पशुसंवर्धन खात्याचे बजेट ४०० कोटींवरून ४५०० कोटी झाल्याचेही त्यांनी नमूद केले. अधिकाऱ्यांना इशारा देताना "शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यात कसूर करू नये, हे खपवून घेतले जाणार नाही," असे सभापती वैकुंठ पाटील म्हणाले.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आमदार रविशेठ पाटील होते तर कृषी व पशुसंवर्धन दुग्धशाळा समितीचे सभापती वैकुंठशेठ पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. जि.प. च्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रूपाली सातपुते, जिल्हा कृषी अधिकारी महेश नारायणकर, पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर, तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर व कर्जत भात संशोधन केंद्राचे डॉ. सांगवीकर यांच्यासह तालुक्यातील शेकडो शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार रविशेठ पाटील यांनी पेणच्या कृषी परंपरेला उजाळा दिला. "पेण तालुक्याने एका काळी अख्ख्या महाराष्ट्राला तांदूळ पुरवला. एकरी साडेचार खंडी भात पिकायचा. आज नैसर्गिक संकट व वाढत्या मजुरीमुळे शेतकरी कमजोर झाला. तरी कोकणातला शेतकरी कधी आत्महत्या करत नाही. शासनाने जास्तीत जास्त मदत शेतकऱ्यांना द्यावी," असे आवाहन त्यांनी केले.

तालुका कृषी अधिकारी सागर वाडकर यांनी मेळाव्यामागील उद्देश स्पष्ट केला. घरचे बियाणे वापरणाऱ्या शेतकऱ्यांनी त्यावर प्रक्रिया करूनच पेरणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले. कर्जत भात संशोधन केंद्रातील भाताच्या नवीन जातींचे प्रदर्शन हे मेळाव्याचे खास आकर्षण ठरले. शेतकऱ्यांना ट्रॅक्टर,सोलर, ताडपत्री, इंजिन ऑईल, ब्रश कटर, बॅटरी ऑपरेटेड पंप, टेन ड्रम, नारळ सीडी, फॉर्मिंग सर्टिफिकेट, वाटप करण्यात आले.

# डॉ. धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयाला ४० लाख रुपयांची आरोग्य उपकरणे

**कर्जत : प्रतिनिधी**

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने कर्जत उपजिल्हा रुग्णालयाला चाळीस लाख रुपये किमतीची आरोग्य उपकरणे देण्यात आली. विशेष म्हणजे ज्या उपकरणांची उपजिल्हा रुग्णालयाला आवश्यकता आहे. तीच उपकरणे उपलब्ध करून देण्यात आल्याने गरीब व गरजू रुग्णांची आरोग्य सेवा अधिक चांगली होऊ शकते.



डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने आरोग्य उपकरणे वाटप सोहळ्याचे आयोजन रॉयल गार्डन सभागृहात करण्यात आले होते. समारंभाचे अध्यक्ष सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सोनाने यांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करून समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. विजय म्हस्कर, उपविभागीय अधिकारी प्रकाश संकपाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड उपस्थित होते. श्री सदस्य भगवान भोसले आणि श्रीधर बुंधाटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

याप्रसंगी कर्जत उपजिल्हा रुग्णालयासाठी आणलेली चाळीस लाख रुपये किंमतीची आरोग्य उपकरणे मान्यवरांच्या हस्ते डॉ. विजय म्हस्कर यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी डॉ. म्हस्कर यांनी, 'आज देण्यात आलेली आरोग्य उपकारणांची देणगी अमूल्य आहे. नुकतीच डायलीसिसच्या उपकरणांचे लोकार्पण झाले आहे. त्यासाठी सहा महिने पुरतील इतकी औषधे प्रतिष्ठानच्या वतीने आज देणगी स्वरूपात मिळाली. त्यामुळे सर्वसामान्यांना उपचार करणे अधिक सुलभ होईल. आपल्या रुग्णालयात टुडी इको तपासणीची कमतरता आहे. ती एका महिनाभरात उपलब्ध होण्यासाठी मी प्रयत्नशील आहे.' असे सांगितले. राहुल गायकवाड यांनी आमचे कुटुंब प्रतिष्ठानशी जोडलेले आहे. त्यांच्या कार्याची महती आम्हाला माहित आहे.' असे स्पष्ट केले.

याप्रसंगी माजी उपसभापती मनोहर थोरवे, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, उपगराध्यक्ष संतोष पाटील, नगरसेवक अशोक राऊत, तातू पेमारे, अशोक भागित, किशोर ठाकरे, जनार्दन भासे, माजी नगरसेविका भारती पालकर, सुवर्णा निलधे, अमोल मानकामे यांच्यासह श्री सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महिला बचत गटांना एकत्र करून रोपवाटिका निर्मिती

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागातील जनतेला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मुंबई येथील युनायटेड वे ही संस्था गेली अनेक वर्षे कार्य करीत आहे. पाथरज ग्रामपंचायत मधील डोंगरपाडा येथील महिलांना एकत्र करून बचत गट स्थापन केले. या महिलांनी रोपवाटिका यांच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याचा प्रयत्न केला आहे.



युनायटेड वे या संस्थेकडून कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि शैक्षणिक तसेच जल या विषयांवर काम करणारे या संस्थेने अनेकांना रोजगार दिला आहे. या संस्थेने पाथरज ग्रामपंचायत मधील डोंगरपाडा गावातील महिलांना जनजागृती निर्माण केली. त्या माध्यमातून बचत गटाची निर्मिती केली. युनायटेड वे कडून प्रेरणा बचत गट स्थापन करून महिलांना रोपवाटिका निर्माण करण्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी तळेगाव येथे पाठवले. तेथे रोपवाटिका निर्माण करण्याचे तीन दिवसांचे प्रशिक्षण प्रेरणा महिला बचत गटां मधील अनसूया करडुळे, छाया लोहकरे, आरती लोहकरे, अपर्णा लोहकरे, फसाबाई बुरुड, गुलाब तिटकारे, भारती तिटकारे, दुर्गा लोहकरे, पुष्पा बुरुड आणि दया लोहकरे यांनी घेतले.

प्रशिक्षण घेऊन आलेल्या महिलांना डोंगरपाडा येथे आल्यावर कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षकांकडून मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर प्रेरणा महिला बचत गटाच्या महिलांनी आपल्या शेत जमिनीवर पाण्याची व्यवस्था करून आंब्याच्या बागेत रोपवाटिका निर्माण केली. त्यासाठी ग्रीन नेट वापरून त्यांच्या आधारे बंदिस्त जागा तयार केली. त्या जागेचा फायदा तापमान नियंत्रित करण्यास मदत झाली. पुढे त्या रोपवाटिके मध्ये तळेगाव येथे जाऊन घेतलेल्या प्रशिक्षणाचा फायदा घेत लहान रोपे तयार करण्यास सुरुवात केली आहे. सध्या त्यांच्या रोपवाटिकेत ५०० हून अधिक रोपे तयार असून त्या ठिकाणी किमान १० हजार रोपे निर्मितीचे या बचत गटाने ठेवले आहे. सर्व रोपे पावसाळा सुरू झाल्यानंतर जून - जुलै महिन्यात लागवडीसाठी विक्री केली जातात.त्या दृष्टीने या रोपवाटिकेत रोपांची निर्मिती केली जात आहे. बचत गटाच्या सर्व महिला सकाळी आणि संध्याकाळी त्या रोपवाटिकेत एकत्र येऊन रोपांची काळजी घेतात.

पान १ वरुन

## भाजपचा पंचरंगी विजय

सत्ताधारी DMK ५० जागांसह तिसऱ्या स्थानी घसरला आहे. AIADMK ७४ जागांवर आहे. भाजप ४ जागांवर आघाडीवर आहे. बहुमतासाठी ११८ जागा आवश्यक असल्याने TVKला १२ जागा कमी पडत आहेत. त्यामुळे भाजप-AIADMK पाठिंब्याशिवाय सरकार स्थापन होऊ शकत नाही. म्हणजेच तामिळनाडूच्या पुढील सरकारची किल्ली भाजपच्या हातात आहे.

केरळमध्ये काँग्रेसप्रणित UDFने ८९ जागांवर आघाडी घेत बहुमताचा ७१चा आकडा पार केला आहे. LDF ४८ जागांवर आहे. भाजपने नेमोम, कझाकुट्टम, मंजेश्वर, पलक्कड व चाथन्नूर या ५ जागांवर आघाडी घेत केरळ विधानसभेत प्रथमच चांगला आकडा गाठला आहे. २०२१ मध्ये भाजपला एकही जागा नव्हती.

## पनवेलमध्ये भाजपचा आनंदोत्सव

नगरसेवक अजय बहिरा, शहर सरचिटणीस अमित ओझे, प्रशांत शेट्ये, शिल्पा म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा देत हा विजय देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पक्षाच्या नेतृत्वाचे अभिनंदन करीत आगामी काळातही अशाच प्रकारे जनतेचा विश्वास संपादन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## शासकीय कामात अडथळा गुन्हा दाखल

**मुरुड :** मुरुड पोलीस ठाण्यातच गोंधळ घालत शासकीय कामात अडथळा आणल्याची धक्कादायक घटना मुरुड येथे घडली आहे. १ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुरुड पोलीस ठाण्यात एका गुन्ह्याविषयी फिर्यादी यांना तपासासाठी बोलावण्यात आले होते. यावेळी तुम्हाला बघून घेतो अशी उघड धमकी देत त्यांनी सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केला. या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत मुरुड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.


महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

म.औ.वि.म.

ई निविदा सूचना क्रमांक १२/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा येथील नवीन पाणीपुरवठा योजनेच्या फिल्टर बेड क्र. ४ ची दुरुस्ती व बळकटीकरण करणे. (दुसरी मागणी) | ₹ ३९,७४,२७०.०० |

उपरोक्त कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०६/०५/२०२६ ते दिनांक १५/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक ०७/०५/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०८/०५/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# मान्सूनपूर्व तयारी व आपत्ती व्यवस्थापन कामाचा आयुक्तांनी घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थिती टाळण्यासाठी पनवेल महानगरपालिकेकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात आयोजित नियोजन बैठक आज आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यालयात घेण्यात आली. यावेळी विविध विभागांना तत्काळ उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. सर्व विभागांमध्ये समन्वय राखून कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.



यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, पोलिस उपायुक्त तिरूपती काकडे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी , उपअभियंता विलास चव्हाण, चारही प्रभागाचे प्रभाग अधिकारी ,वृक्ष प्राधिकरण विभाग प्रमुख संदिप पवार, पोलिस विभागाचे चारही प्रभागातील वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाहतूक पोलिस, पालिका अधिकारी, सिडको अधिकारी, आयआरबी प्रतिनिधी, उपस्थित होते.

पूरस्थिती उद्भवल्यास गाढी नदी परिसरातील नागरिकांसाठी तात्पुरते निवारा (ट्रान्झिट कॅम्प) उभारण्याची तयारी करणे व त्या अनुषंगाने सर्व तयारी करण्याचे आदेश देण्यात आले आहे. तसेच शहरातील सर्व नाले वेळेत साफ करण्याच्या सूचना संबधित विभागाला देण्यात आले. महापालिका क्षेत्रातील पाणी साचणाऱ्या ठिकाणांची आढावा घेऊन तेथे त्वरित उपाययोजना करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. फायर ब्रिगेड यंत्रणा सज्ज ठेवण्याबरोबरच,धोकादायक इमारती रिकाम्या करण्याच्यादृष्टीने सिडको,एमएसीबी यांनी सहकार्य करण्याच्या सूचना या बैठकित देण्यात आल्या. तसेच धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून त्याची माहिती पोलिस विभागाला देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पावसाळ्यात पांडवकडा भागात पोलिस बंदोबस्त करण्याबाबत करण्याविषयी आयुक्तांनी पोलिस विभागास सांगितले. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवरती एसटीपी प्लॅन्टमधील पंप सुरू ठेवावेत, त्यांची तातडीने दुरूस्ती करून ठेवण्याबाबत आयुक्तांनी सिडको अधिकाऱ्यांना सूचित केले. याचबरोबर बस स्टॅन्डसमोरील हायवेवरील रस्त्यावर पडणारे पाण्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व आयआरबी यांना आयुक्तांनी सूचित केले. याचप्रमाणे रस्त्यांकडील होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडीट करून महापालिकेस कळविण्यासंबधितआयुक्तांनी सूचना दिल्या. महापालिका कार्यक्षेत्रातील आत्तापर्यंत झालेल्या नालेसफाईच्या कामाचा आढावा घेऊन उर्वरीत लहान मोठ्या सर्व नालेसफाईची कामे २० मेपर्यंत पुर्ण करण्याबाबत आयुक्तांनी आरोग्य विभागास सूचना दिल्या. पावसाळ्यात साथीचे रोग रोखण्यासाठी धूर व जंतुनाशक फवारणी यंत्रणा तयार ठेवण्याचे निर्देश आरोग्य विभागाला देण्यात आले आहेत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवरती साथरोगासारखे विकार उद्‌भवल्यास तयारीच्या दृष्टीने औषधसाठा व इतर वैद्यकिय सेवासुविधांची पुर्तता करण्याबाबत वैद्यकिय आरोग्य विभागास आयुक्तांनी सांगितले.

शहरातील सर्व वॉर्ड अधिकाऱ्यांना आपत्कालीन साहित्य व यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नवीन पनवेल व इतर भागातील अंडरपासमध्ये पाणी साचण्याच्या समस्या दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहेत. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीसाठी रस्ते खड्डेमुक्त ठेवणे, पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी पाईपलाईन दुरुस्ती करणे व इतर अनुषंगिक कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. वृक्ष प्राधिकरण विभागाला धोकादायक झाडांच्या छाटणीचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून, वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी एमएसईबी विभागाला विशेष दक्षता घेण्यास सांगण्यात आले आहे.

धोकादायक वीजवाहिन्या व खांब हटविणे, तसेच आवश्यक ठिकाणी त्यांचे स्थलांतर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या बैठकिमध्ये सर्व विभागांमध्ये समन्वय राखून कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. यावेळी या बैठकिला उपस्थित विविध विभागाच्या अधिकाऱ्याचे आभार परिवहन उपायुक्त कैलास गावडे यांनी मानले.

# कर्नाळा अभयारण्यात ११३ वन्यजीव पशू-पक्ष्यांची नोंदणी; इतर गायब

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा पक्षी अभयारण्यात दि.१ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी केलेल्या २४ तासांच्या वन्यजीवांच्या नोंदणीचा अहवाल आला आहे.या कर्नाळा अभयारण्य प्रशासन आणि स्थानिक निसर्गमित्र संघटनांनी संयुक्त वन्यजीव नोंदणीच्या मोहिमेत ११३ वन्यजीव-पक्ष्यांच्या नोंदी करण्यात आल्या आहेत.मात्र पुन्हा एकदा या सर्वेक्षणात बिबटे हरीण सारखे वन्यजीव आढळले नसल्याने चिंतेची बाब समोर आली आहे.





कर्नाळा पक्षी अभयारण्य रायगड जिल्ह्यातील पनवेलजवळील एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे.१९६८ साली स्थापन करण्यात आले आहे.मुंबई-गोवा महामार्गावर १२.१५ चौ किमी क्षेत्रावर हे अभयारण्य पसरलेले असून येथे १५० हून अधिक स्थानिक आणि ३७ स्थलांतरित पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात

यावर्षी कर्नाळा अभयारण्यात तीन ठिकाणी मचाण देखील उभारण्यात आले होते.तसेच पाणवठ्यावर ट्रॅक कॅमेरे बसविण्यात आले होते.जवळपास १८ जणांनी हे सर्वेक्षणाचे काम पाहिले.मात्र कर्नाळा अभयारण्य पसरतील वृक्षतोड ,नष्ट होणारे जंगल,मानवी हस्तक्षेपामुळे याठिकाणाहून वन्यजीवांच्या विविध प्रजाती नष्ट होत चालल्या आहेत.पाहणी ११३ नोंदी मध्ये २४ सस्तन प्राणी व ८९ पक्ष्यांची नोंद झाली असली तरी बिबटे ,हरीण ,रान गवा सारखे मोठ्या संख्येने अधिवास असलेले प्राणी नष्ट होत चालले आहेत.अनेक वेळा या परिवारात वाघाचे अस्तित्व असल्याचे गावकऱ्यांकडून सांगितले जात होते.मात्र वाघासह इतर जंगली प्राणी नष्ट झाल्याचे या नोंदणीत स्पष्ट झाले आहे.मागील पाच वर्षांपासून कर्नाळा अभयारण्यातील वन्यजीवांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली.मुंबई गोवा महामार्गाच्या रुंदीकरणात अभयारण्याचा अनेक भाग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून प्रभावित झाला.वाहनांची सततची येजा ,घाटातील अपघात यामुळे साहजिकच वन्यजीवावत त्याचा परिणाम जाणवतो.कर्नाळा अभयारण्यात माकडांची संख्या सोडल्यास इतर वन्यजीवांची संख्या कमालीची घटली आहे.

### नोंदणीत आढळलेले वन्यजीव

*सस्तन प्राणी :- माकड ८, हनुमान लंगुर ७, खार ३, रानडुक्कर ३, पाचू कवडा २, वटवाघूळ २, पक्षी :- टिटवी ६, रानकोंबडा ४, होला ४, दयाळ ४. मोर १, नवरंग २, डुडुळा घुबड १, भृंगराज १, शिळकरी कस्तूर १ यांसारख्या महत्वाच्या प्रजातींची नोंद झाली. एकूण ३५ हून अधिक प्रजातींचे पक्षी आढळले.*

# पनवेल तालुक्यात सलग दोन दिवसांत घडलेल्या हत्याकांडांनी परिसर हादरला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यात सलग दोन दिवसांत घडलेल्या दोन हत्याकांडांनी संपूर्ण परिसर हादरून गेला असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रविवारी बंबई पाडा येथे एका महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच सोमवारी उसली गावाजवळ आणखी एका तरुणाची निर्घृण हत्या झाल्याचे उघडकीस आले आहे.

रविवारी सकाळी बंबई पाडा परिसरात एका महिलेचा मृतदेह घरात आढळून आला होता. तिच्या गळ्यावर आढळलेल्या खुणांवरून गळा आवळून खून केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असतानाच अवघ्या काही तासांत दुसरी धक्कादायक घटना समोर आली. सोमवारी उसली गावाजवळ सुरू असलेल्या रेल्वे पुलाच्या कामाच्या ठिकाणी दोन पिलरच्या मधोमध एका तरुणाचा मृतदेह आढळून आला. मृताची ओळख अमित राय अशी झाली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या डोळ्यांमध्ये भोसकल्याच्या खुणा आढळून आल्याने ही हत्या अत्यंत क्रूर पद्धतीने करण्यात आल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दोन्ही घटनांची माहिती मिळताच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर घटनास्थळी गर्दी केली असून पनवेल तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सलग दोन दिवसांत दोन खून झाल्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

पोलीस पथकांनी दोन्ही ठिकाणी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले असून या हत्यांमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वैयक्तिक वाद, जुने वैमनस्य किंवा इतर गुन्हेगारी कारणांचा कोन तपासात तपासला जात आहे. या प्रकरणांचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि संशयितांची चौकशी यावर भर दिला जात आहे. सलग घडलेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे पनवेल तालुका हादरला असून नागरिकांनी तातडीने कडक पोलीस बंदोबस्त आणि गुन्हेगारीवर आळा घालण्याची मागणी केली आहे.

# सभापती रंजना वास्कर यांचा गावे, आदिवासी वाड्यांचा दौरा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांनी कोन आणि विचुंबे पंचायत समिती गणांमधील विविध गावांचा आणि आदिवासी वाड्यांचा दौरा करून ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. या दौऱ्यामध्ये प्रामुख्याने भिंगार ग्रामपंचायत हद्दीतील भिंगार भेरलेवाडी, चिखले ग्रामपंचायत हद्दीतील सांगडे, वारदोली ग्रामपंचायत हद्दीतील बेलवली, वारदोली हालटेप, तारटेप तसेच विचुंबे गणातील वांगणी तर्फे वाजे ग्रामपंचायत हद्दीतील लोणीवली, पालीखुर्द, मोहोचा पाडा, मोहो, वांगणी आणि आंबिवली येथील प्राथमिक शाळा, अंगणवाडी व ग्रामपंचायतींचा समावेश होता.

दौऱ्यादरम्यान ग्रामस्थांनी रस्ते आणि पाणीटंचाईच्या समस्या सभापतींसमोर मांडल्या. या तक्रारींची दखल घेत सभापती रंजना वास्कर यांनी अपूर्ण असलेल्या पाण्याच्या योजना तातडीने पूर्ण करण्याचे आणि गरजेनुसार नवीन बोअरवेल घेण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. ही



### विकासकामे मार्गी लावण्याचे आश्वासन

सर्व विकासकामे आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या निधीसह जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सेस निधीतून लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी ग्रामस्थांना दिले. याच दौऱ्याच्या निमित्ताने जिल्हा परिषद शाळांमध्ये बसवण्यात आलेल्या नवीन प्रोजेक्टरचे उद्‌घाटनही सभापती तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी आता डिजिटल शिक्षणाशी जोडले जाणार आहेत. या दौऱ्यावेळी उपसभापती भूपेंद्र सदानंद पाटील, जिल्हा परिषद सदस्या प्राची जाधव, पंचायत समिती सदस्या योगिता लहाने, नीलम भिंगारकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव आणि विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्यासह योगेश लहाने, सतीश मालुसरे, प्रवीण पालव, संतोष पवार, अतिष मालुसरे, महेंद्र भोईर, गुरुनाथ भोईर, प्रवीण म्हात्रे, गणेश पाटील, संतोष शेळके, चिंतामणी शेळके, अरुण जळे, प्रमोद घरत, जितू बताले, सतीश पाटील, हेमंत तांडेल, दिनेश पाटील, राम भवर, प्रवीण पाटील यांच्यासह सरपंच, उपसरपंच, सदस्य, पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेत लोकशाही दिन साजरा

**पनवेल :रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयामध्ये आज दिनांक ०४ मे रोजी आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले. यावेळी उपायुक्त स्वरूप खारगे, पशुवैद्यकिय भगवान अधिकारी डॉ. गीते, महापालिका अधिकारी उपस्थित होते. आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा विभागाचे दोन अशा अर्ज दाखल झाले होते, या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.



# पनवेलचा ओरायन मॉल नव्या युगाच्या आधुनिकतेचे प्रतीक - अभिनेत्री ऋतुजा बागवे

**पनवेल : वार्ताहर**

ग्राहकांसाठी आंतरराष्ट्रीय-राष्ट्रीय ब्रँड असलेली दुकाने, ग्राहकांच्या पसंतीस उतरलेला एक भला मोठा मॉल,फॅमिली टाइमिंग साठी निर्माण केलेली जागा त्यामुळे नव्या युगाच्या आधुनिकतेचं प्रतीक म्हणजे ओरायन मॉल असल्याचे गौरवोद्‌गार सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री ऋतुजा बागवे हिने पनवेल येथे काढले.



पनवेलमधील ओरायन मॉलला १० वर्ष पूर्ण झाल्याबद्दल मॉलतर्फे दशकपूर्ती सोहळा साजरा करण्यात आला.या सोहळ्यास ओरायन मॉलचे मालक मंगेश परूळेकर,मनन परुळेकर तसेच प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.यावेळी शॉप अँड विन अंतर्गत महापुरस्कार विजेत्यांची लकी ड्रॉ काढून घोषणा करण्यात आली. लकी ड्रॉमध्ये प्रथम अक्षय घरत, द्वितीय राम बाबू,तृतीय निर्मला सिंग असे अभिनेत्री ऋतुजा बागवे हिच्या हस्ते नंबर काढण्यात आले.ऋतुजा बागवे यांनी,पनवेल हे प्रगत शहर आहे.अशा या शहरामध्ये ओरायन मॉलने आपली मॉल संस्कृती जपली आहे, ग्राहकाला आपला केंद्रबिंदू मानून मॉलतर्फे आकर्षक बक्षीस योजना राबवत आहेत .त्याचा मला एक भाग होता आल.मॉल आणि ग्राहक अशा बक्षीस योजनांमुळे त्यांचे नातं घट्ट निर्माण होईल असा विश्वास शेवटी ऋतुजा बागवे यांनी व्यक्त केला. ओरॉयन मॉलचे मालक मंगेश परुळेकर यांनी,ओरायन मॉलची ज्या वेळेला आम्ही सुरुवात केली, त्यावेळेला आम्हाला खूप मोठी आव्हाने होती.आम्ही यामध्ये कितपत यशस्वी होऊ असे असताना पनवेलकरांनी आम्हाला दहा वर्षाची मोठी साथ दिली, त्यामुळे मी पनवेलकरांचे आभार मानतो.

आम्ही रोजगार उपलब्ध करून दिला.ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याने आम्ही आता राज्याच्या बाहेर ओरायन मॉल ब्रँडचा विस्तार करणार असल्याचे मंगेश परुळेकर यांनी सांगितले.

दशकपूर्ती निमित्ताने मॉलतर्फे केक कापून आनंदोत्सव साजरा केला.या लकी ड्रॉमधील विजेत्यांना प्रथम बक्षीस मारुती सुझुकी वॅगनआर कार ,द्वितीय बक्षीस जावा बाईक आणि तृतीय बक्षीस ४३ इंच स्मार्ट टीव्ही बक्षिसे दिली जाणार आहेत.

# सकल हिंदू समाजातर्फे विशाल हिंदू संमेलन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या गौरवशाली सनातन संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी आणि भावी पिढीला स्वाभिमानाचा वारसा देण्यासाठी पनवेलमधील ठाणा नाका, साईनगर, किनारा व पायोनिअर वस्ती येथील सकल हिंदू समाजातर्फे आयोजित करण्यात आलेले 'विशाल हिंदू संमेलन' मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

साईनगर सोसायटीच्या मैदानावर पार पडलेल्या या कार्यक्रमात हिंदू धर्माचा जागर करण्यासाठी आणि विखुरलेल्या मनांना एकत्र गुंफण्यासाठी शेकडो नागरिक सहभागी झाले होते. या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे आणि माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या संमेलनासाठी प्रमुख वक्ते म्हणून हिंदू जागरण मंचचे कोकण प्रांत सहसंयोजक मनोज शंभू सिंह, हिंदू जागरण मंचच्या प्रांत महिला सुरक्षा व सन्मान आयाम प्रमुख रूपाली जोशी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य विवेक भागवत उपस्थित होते.

वयांनी हिंदू धर्म, संस्कृती आणि परंपरा जोपासण्यासोबतच समाजातील एकतेच्या महत्त्वावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे पुणे येथील शिवाई संस्थेद्वारे सादर करण्यात आलेले 'शिवकालीन शस्त्र प्रदर्शन' आणि 'शिवशस्त्र गाथा' हे होते. तसेच, गड संवर्धन तळोजा यांच्यातर्फे शिवकालीन युद्ध कलांचे चित्तथरारक प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्याने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.



## संपादकीय

# उंचावली विजयध्वजा!

देशातील मतदारांच्या निर्विवाद पसंतीचा पक्ष आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे लोकमान्य नेतृत्व या भक्कम शक्तीच्या साथीनेच देश प्रगतीची शिखरे पादाक्रांत करेल, असा जनतेचा विश्वास असल्याचे स्पष्ट संकेत ताज्या निकालांनी दिले आहेत.

**पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, केरळ ही चार राज्ये आणि पुड्डुचेरीमधील विधानसभा निकालांमुळे एक गोष्ट स्पष्ट झाली आहे. पश्चिम बंगालमधील तब्बल पंधरा वर्षांची ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची सत्ता समूळ उखडून भारतीय जनता पार्टीने देशाच्या पूर्वदिशा आपल्या विजयाने उजळल्या आहेतच, पण भारताच्या लोकसंख्येचा जवळपास ७८% भाग भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारांच्या सत्तेच्या सावलीत समाविष्ट करून घेत राजकारणातील एक ऐतिहासिक स्थानदेखील प्राप्त केले आहे. देशातील दर दहा भारतीयांपैकी जवळजवळ आठ मतदार भाजपला कौल देतात असा निष्कर्ष काढता यावा अशी भक्कम जनाधाराची पुंजी भाजपने गोळा केली असून आज आसाम, पश्चिम बंगाल, पुड्डुचेरी विधानसभा निवडणुकांतील ऐतिहासिक विजय व विधानसभा पोटनिवडणुकांच्या सातपैकी पाच जागांवरील रालोआचा विजय पाहता, मतदारांच्या अपेक्षापूर्तीचे एक मोठे आव्हान भाजपने जबाबदारीपूर्वक शिरावर घेतले आहे. या निवडणुकांतील भाजपचा विजय हा केवळ पक्षाच्या निवडणूक रणनीतीचा विजय नाही, तर प्रादेशिक व परिवारवादी पक्षांना नाकारून राष्ट्रीय राजकारणास प्राधान्य देण्याच्या जनतेच्या बदलत्या मानसिकतेचा विजय म्हणावा लागेल. प्रादेशिक पक्षांच्या प्रस्थापित राजकारणाला बगल देऊन सत्ताकारणात बदल करण्याची मतदारांची मानसिकता आहे, हे गेल्या अनेक निवडणुकांमध्ये सिद्ध झाले होते. जेमतेम वर्षभरापूर्वी स्थापन झालेल्या पक्षाने २३४ जागा असलेल्या तमीळनाडूसारख्या राज्यात थलापती विजय यांच्या पक्षाने सत्तास्थानापर्यंत मारलेली मजल हे मतदारांच्या बदलत्या मानसिकतेचेच उदाहरण म्हणता येईल. प्रादेशिक आणि परिवारवादी राजकारणास आव्हान देऊन राष्ट्रीय राजकारण सत्तेच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या एका संघर्षातून परिवर्तनाचा नवा प्रवाह आता निर्माण झाला आहे, आणि प्रादेशिक पक्षांच्या अस्मितेच्या संकुचित राजकारणाऐवजी राष्ट्रीय हिताच्या व्यापक राजकारणास मतदारांची मान्यता मिळत आहे. हेदेखील आता अधोरेखित होऊ लागले आहे. विकास, सुशासन आणि देशहित हेच निवडणुकीच्या राजकारणाचे सूत्र समोर ठेवून भाजपाने या मुद्द्यावर केलेला प्रामाणिक प्रचार जनतेने स्वीकारला. पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदाच, आसाममध्ये सलग तिसऱ्यांदा आणि पुड्डुचेरीमध्ये दुसऱ्यांदा भाजपच्या नेतृत्वाखाली सत्तास्थापनेचा शंखनाद सुरू झाला आहे. याच पश्चिम बंगालमध्ये लाल क्रांतीच्या नावाखाली नक्षलवादाची बीजे रोवली गेली आणि त्यांची विषवल्ली देशभर फोफावली. आज नक्षलवाद उखडून काढण्यात भाजपला यश आले आहेच, पण जेथे त्याचा जन्म झाला त्या भूमीवरही भाजपचा झेंडा फडकला आहे. उद्योगांविषयीच्या आकसाच्या राजकारणामुळे खुंटलेला औद्योगिक विकास, त्यामुळे फोफावलेली बेरोजगारी, मतांच्या राजकारणातून अभय मिळालेली बेकायदा घुसखोरी यांमुळे पश्चिम बंगालचे कंगाल झालेले राजकारण आता रुळावर येईल अशी तेथील जनतेची अपेक्षा आहे. मतदारांचे आभार मानताना स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ती पूर्ण करण्याची ग्वाही दिलेली आहे. खऱ्या अर्थाने देशाच्या पूर्वेला उजळलेली ही भगवी पहाट विकासाच्या व्यापक वाटा उजळेल आणि निवडणुकांचे राजकारण ही केवळ सत्तेची साठमारी नसून देशहिताचे व्रत आहे हे सिद्ध होईल. परिवर्तनाचे हे नवे पर्व सुरू करणारे मतदार जागा आहे आणि तोच खरा लेकशाहीचा भक्कम धागा आहे, याचा याहून वेगळा पुरावा असू शकत नाही.**

# बालकवी अर्थात त्र्यंबक ठोंबरे



त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ बालकवी हे मराठीतील एक श्रेष्ठ आधुनिक मराठी कवी. त्यांचा जन्म जळगाव जिल्ह्यातील धरणगाव येथे १३ ऑगस्ट १८९० रोजी झाला. बालकवींच्या वडिलांची पोलीस खात्यातील नोकरी फिरतीची असल्यामुळे त्यांच्या शिक्षणाची आबाळ झाली. एरंडोल, यावल, जामनेर, बेटावद अशा निरनिराळ्या ठिकाणी त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाले. धुळे येथील प्रिपरेटरी स्कूल आणि अहमदनगर येथील अमेरिकन मिशन हायस्कूल या शाळांत त्यांचे इंग्रजी शिक्षण झाले. तेही सलगपणे नव्हे. देशभक्तीच्या तत्कालीन कल्पनांच्या प्रभावामुळे बालकवींना तसेच त्यांच्या वडिलांना इंग्रजी शिक्षणाबाबत उत्साह नव्हता. त्यामुळे बराचसा अभ्यास घरीच झाला. बालकवींची वडील बहीण जिजी हिने त्यांना संस्कृताचे आरंभीचे पाठ दिले. कवितेची गोडीही तिनेच लाविली. पुढे संस्कृत भाषेवर पुढे त्यांनी प्रभूत्व मिळविले.

त्र्यंबक ठोंबरे यांनी पंडिती कविता आणि शाहिरी कविता यांचा समरस होऊन व्यासंग केला होता. इंग्रजी कवितेचे त्यांचे वाचन मर्यादित असले तरी इंग्रजी कवितेची त्यांची समज उत्तम होती. अहमदनगरच्या मिशन स्कूलमध्ये तसेच महाबळेश्वर येथील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या एका शाळेत काही काळ ते अध्यापक होते.

वयाच्या तेराव्या वर्षी नवापूर येथे असताना त्यांनी आपली पहिली कविता लिहिली. या कवितेला त्यांनी शीर्षक दिलेले नव्हते (तथापि बालकवींच्या समग्र कवितेचे संपादक प्रा. भा. ल.पाटणकर यांनी तिला 'वनमुकुंद' असे नाव दिलेले आहे). कवितेच्या लयीची जाणीव, निसर्गप्रेम, श्रद्धा ही बालकवींच्या कवितेची काही लक्षणीय वैशिष्टै त्यांच्या या पहिल्या कवितेत बीजरूपाने जाणवतात. पुढे तीन-चार वर्षांत त्यांची कविता अधिकाधिक विकसत गेली आणि जळगाव येथे भरलेल्या पहिल्या मराठी कविसंमेलनात (१९०७) त्यांनी केलेल्या काव्यवाचनामुळे प्रभावित होऊन संमेलनाध्यक्ष कान्होबा रणछोडदास कीर्तिकर यांनी त्यांना 'बालकवी' हे नाव देऊन त्यांचा गौरव केला. त्यानंतर लवकरच मराठीतील श्रेष्ठ कवी म्हणून त्यांचा लौकिक झाला 'बालकवी' हे नावही रूढ झाले.

बालकवींची विशेष ख्याती आहे ती निसर्गकवी म्हणून, किंबहुना त्यांच्या बहुतेक कवितांत निसर्ग मध्यवर्ती आहे. त्यांच्या काही नामांकित कवितांची शीर्षकेच पाहा : 'निर्झरास', 'फुलराणी', 'संध्या-रजनी', 'अरुण', पण रूढ अर्थाने निसर्गसौंदर्याचे वर्णन हा अशा कवितांचा हेतू नाही. निसर्गाशी तादात्म्य पावलेल्या कविमनाचे ते सहजोद्गार आहेत. निसर्गातील विविध दृश्यांत त्यांना मानवी भावना दिसतात. म्हणजे हे निसर्गाचे मानवीकरण नाही किंवा अचेतन वस्तूंवर चेतनारोप नाही. 'फुलराणी'तील एक कलिका आणि सूर्यकिरण यांची नाजुक प्रीतिकथा या दृष्टीने लक्षणीय आहे. ती जेवढी अतिमानवी तेवढीच मानवी आहे. 'अरुण'मध्ये पहाट फुटते या घटनेभोवती कल्पनाशक्तीच्या विभ्रमांचे भान हरविणारे जाळे विणले आहे, पण त्या केवळ उत्प्रेक्षा नव्हेत. त्या घटनेत भाग घेणाऱ्या निसर्गातील विविध गोष्टी तेथे सजीव होतात. इतकेच नव्हे; तर कवितेच्या किमयेने रसिकही त्यांच्यशी एकरूप होतो. त्यांमागील दिव्य आणि मंगल यांच्या जाणिवेतून अपूर्णजगातील पूर्णतेचा आणि पृथ्वी व स्वर्ग यांच्यातील बंधाचा साक्षात्कार होतो. लौकिक सौंदर्याला अनेकदा त्यांच्या कवितेत अलौकिकाचा स्पर्श होतो. साध्या वर्णनात प्रतीकाची गहिरी सूचना लपलेली असते. 'औदुंबर' ही त्यांची छोटीशी कविता बहुचर्चित ठरली ती यामुळेच (आलोचना मासिक फेब्रुवारी १९८०).

विषयाशी असे तादात्म्य ज्या संवेदनाशक्तीमुळे बालकवींना साध्य होऊ शकले ती आधुनिक मराठी कवितेत काहीशी अनोखी होती. पुढे बा.सी. मर्ढेकर यांनी तिच्याकडे आवर्जून लक्ष वेधले. मर्ढेकरांच्या स्वतःच्या कवितेवर बालकवींचा मोठा प्रभाव होता. त्यांच्या आरंभीच्या कवितेवर तो स्पष्टपणे दिसतोच, पण त्यांनी नंतर लिहिलेल्या आणि वरवर फार वेगळ्या वाटणाऱ्या त्यांच्या नवकवितेतही सूक्ष्म दृष्टीला त्याचा आढळ होईल. अगदी अलीकडच्या ग्रेस आणि ना.धों. महानोर यांसारख्या परस्परांहू वेगळ्या प्रकृतीच्या कवींच्या घडणीतही बालकवींचा भाग जाणवेल, किंबहुना विशुद्ध कवितेचा गेल्या तीस-पस्तीस वर्षांत जो कमी-अधिक आविष्कार निरनिराळ्या कवींत दिसला त्याच्याशी बालकवींचा अन्वय दुरून किंवा जवळून लावता येईल. अर्थात नादमाधुर्य, निसर्गातील कोमल तपशिलांचे नाजुक वर्णन इ. बालकवींच्या प्रसिद्ध वैशिष्ट्यांचे पुष्कळ अनुकरण झाले, पण असे कवी अनुकरणापार गेले नाहीत. त्यांची संवेदना तेवढी तरल आणि समृद्ध नव्हती.


बालकवींना केशवसुतांच्या परंपरेत बसवले जाते, पण ते तारतम्याने करायला हवे. केशवसुतांचे संस्कार त्या कालखंडातील इतर बहुतेक प्रमुख कवींप्रमाणे बालकवींवरही झाले होतेच. 'धर्मवीर'सारख्या त्यांच्या काही कवितांचे विषय आणि त्यांतील विचार, केशवसुती वळणाचे होते, पण या कविता त्यांच्या उत्तम कवितांपैकी नव्हेत. बालकवींचा पिंडच निराळा होता.

बालकवी म्हणजे केवळ 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबून' घेण्याचा ध्यास लागलेले स्वप्नाळू, निरागस बालवृत्तीचे कवी नव्हेत. त्यांच्या उत्तर आयुष्यातील काही कवितांचा सूर अगदी निराळा आहे. बालभावाने बांधलेली आणि जोपासलेली स्वप्नसृष्टी काजळत आणि कोलमडत आहे या दुःखाची तडफड 'कविबाळे' या कवितेत आहे. सृष्टीची खिन्न, उजाड रुपे त्यांच्या मनाला घेरताना दिसतात. 'काय बोचते ते समजेना, हृदयाच्या अंतर्हृदयाला' अशी जीवघेणी अस्वस्थता त्यांना विफल करते कोठे मृत्यूची सावली तरळत असते. 'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे' म्हणून बागडणाऱ्या बालकवींइतकेच हे त्यांच्या 'पारव्या'प्रमाणे खिन्न, नीरस एकांतगीत गाणारे-बालकवी खरे आहेत.

बालकवींनी काही बालगीतेही लिहिली त्यांतील गीतगुण सहजसुंदर आहे आणि बालवृत्तीही. त्यातील पक्ष्यांविषयीची गीते विशेष सुंदर आहेत. बालकवींच्या सर्वच कवितांच्या रचनेतील नादमयता आणि चित्रगुण अकृत्रिम आणि असामान्य आहेत. जळगावजवळील भादली स्टेशनपाशी रेल्वेचे रूळ ओलांडताना आगगाडीखाली सापडून बालकवींना ५ मे १९९८ रोजी मरण आले.

(साभार : मराठी विश्वकोष)

# गायनाचार्य पं. रामकृष्णबुवा वझे



महाराष्ट्रातील थोर गायक अशी पं. रामकृष्णबुवा वझे यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म सावंतवाडी संस्थानातील ओझरे गावी २८ नोव्हेंबर १८७२ रोजी झाला. ते दहा महिन्यांचे असतानाच त्यांचे वडील वारले. पुढे त्यांची आई त्यांना घेऊन कागल येथे आली आणि मोलमजुरी करू लागली. त्यांचे बालपण फार कष्टात व हालअपेष्टांत गेले. जेमतेम मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. लहानपणापासून बुवांना गाण्याचा नाद होता. त्यामुळे कागलचे गायक बळवंतराव पोहरे यांच्याकडे त्यांचे गाण्याचे प्राथमिक शिक्षण झाले. नंतर ते मालवणला गेले आणि वर्षभर विठोबाआण्णा हडप यांच्याकडे तालीम घेतली.

वयाच्या बाराव्या वर्षी रामकृष्णबुवांचे लग्न झाले. गवई होण्याच्या इच्छेपोटी त्यांनी घर सोडले व इंदूर गाठले. तेथे सुप्रसिद्ध पखवाज वादक नानासाहेब पानसे यांच्याकडे ते राहिले. गाणे शिकण्याची रामकृष्णबुवांची जिद्द जाणून पानसे यांनी त्यांना ग्वाल्हेरला जाण्यास सांगितले. बुवा ग्वाल्हेरला आले आणि ग्वाल्हेर घराण्याचे सुप्रसिद्ध उस्ताद निसार हुसेनखाँ यांच्याकडे गाणे शिकू लागले. माधुकरी मागून अत्यंत कष्टाने व जेथून जे मिळेल तेथून ते घ्यायचे अशा वृत्तीने त्यांनी ग्वाल्हेरला गानविद्या संपादन केली व नंतर लौकिक मिळविण्यासाठी ते बाहेर पडले. रामकृष्णबुवांचे ५ मे १९४५ रोजी निधन झाले.

**-वि. रा. आठवले**



## बदलते तंत्रज्ञान

## 'या' एका चुकीमुळे स्मार्टफोन कायमचा होईल खराब

वाढत्या उन्हाचा तडाखा आता केवळ माणसांनाच नाही, तर खिशातील स्मार्टफोनलाही बसू लागला आहे. मे महिन्याचे कडक ऊन आणि वाढता पारा तुमच्या महागड्या फोनसाठी सायलंट किलर ठरू शकतो. अनेकांना उन्हात उभे राहून तासन्तास बोलण्याची किंवा गेम खेळण्याची सवय असते, मात्र ही एक छोटीशी चूक तुमच्या फोनला नेहमीसाठी निकामी करू शकते. उन्हाळ्यात फोनला 'टाइम बॉम्ब' होण्यापासून वाचवण्यासाठी खालील ५ खबरदाऱ्या घेणे अत्यंत गरजेचे आहे.



बाहेर फिरताना आपण अनेकदा थेट उन्हात फोनवर बोलतो किंवा व्हिडिओ पाहतो. सूर्याच्या प्रखर किरणांमुळे फोनचे बॉडी आणि डिस्प्ले वेगाने तापतात. यामुळे प्रोसेसरवर ताण येतो आणि फोन ओव्हरहीट होतो. शक्यतो उन्हात फोन वापरणे टाळा किंवा सावलीत उभे राहूनच त्याचा वापर करा.


उन्हाळ्यात फोन चार्ज करणे ही मोठी जोखीम ठरू शकते. आधीच वातावरण गरम असताना फोन चार्जिंगला लावल्यास बॅटरीचे तापमान कमालीचे वाढते. यामुळे बॅटरी फुगणे किंवा शॉर्ट सर्किट होण्याचा धोका असतो. नेहमी हवेशीर आणि थंड जागीच फोन चार्ज करा.

आपण फोनच्या सुरक्षेसाठी जाड आणि फॅन्सी कव्हर्स वापरतो, मात्र उन्हाळ्यात हेच कव्हर्स उष्णता बाहेर पडू देत नाहीत. यामुळे फोन आतून गरम होत राहतो. जर तुमचा फोन गरम होत असेल, तर काही काळ कव्हर काढून ठेवा, जेणेकरून उष्णता बाहेर पडण्यास मदत होईल.

एकाच वेळी अनेक ॲप्स सुरू ठेवल्याने प्रोसेसरवर लोड येतो आणि उष्णता निर्माण होते. उन्हाळ्यात गरज नसताना ब्लूटूथ, वाय-फाय आणि जीपीएस बंद ठेवा. तसेच बॅकग्राउंडला सुरू असलेले ॲप्स वेळोवेळी बंद करा, ज्यामुळे फोनचा थंडावा कायम राहील.

जर फोन खूपच गरम झाला असेल, तर तो त्वरित बंद करून थंड जागी ठेवा, पण सावधान! अतिउत्साहात फोन थंड करण्यासाठी कधीही फ्रिजमध्ये ठेवू नका. यामुळे फोनमध्ये ओलावा जमा होऊन सर्किट खराब होऊ शकते. फोन नैसर्गिकरित्या पंख्याच्या हवेत थंड होऊ द्या. एका चुकीच्या सवयीमुळे फोनची बॅटरी कायमची डॅमेज होऊ शकते किंवा त्याची कार्यक्षमता कमी होऊ शकते. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसात स्मार्टफोनचा वापर करताना या 'टेक टिप्स' नक्की फॉलो करा.


# कार्ल मार्क्स : जग बदलणारा विचारवंत



## निमित्त

५ मे १८१८ रोजी जन्माला आलेला कार्ल मार्क्स हा माणूस कदाचित गेल्या २०० वर्षांतील सर्वात प्रभावशाली विचारवंत असेल. ज्याच्या विचारांनी अर्धे जग ढवळून निघाले, क्रांत्या झाल्या, सरकारे उलथली आणि आजही अर्थशास्त्राच्या वर्गात त्याचे नाव घेतल्याशिवाय तास पूर्ण होत नाही. मार्क्सचा जन्म एका सुशिक्षित ज्यू कुटुंबात झाला. वडील वकील होते. त्याने कायद्याचा अभ्यास सुरु केला, पण तत्त्वज्ञान आणि इतिहासात रस घेतला. हेगेलच्या विचारांचा पगडा त्याच्यावर होता. १८४३ मध्ये जेनी वॉन वेस्टफालेनशी लग्न केले. पत्रकारिता करताना त्याचे लेख इतके जहाल होते की प्रशियाच्या सरकारने त्याला देशाबाहेर हाकलले. पॅरिस, ब्रुसेल्स करत तो शेवटी लंडनला स्थायिक झाला. लंडनमध्ये तो प्रचंड गरिबीत राहिला. तीन मुले उपासमारीने गेली. मित्र फ्रेडरिक एंगेल्सच्या आर्थिक मदतीवर त्याचा संसार चालायचा. ब्रिटिश म्युझियमच्या वाचनालयात दिवसाचे १०-१० तास बसून त्याने 'दास कॅपिटल' लिहिले. १८४८ मध्ये एंगेल्ससोबत मिळून त्याने 'कम्युनिस्ट जाहीरनामा' लिहिला. "जगातील कामगारांनो, एक व्हा! तुमच्याकडे गमावण्यासारखे काही नाही, फक्त बेड्या आहेत. जिंकण्यासाठी सारे जग आहे" हे वाक्य इतिहासात अजरामर झाले. १८६७ मध्ये 'दास कॅपिटल'चा पहिला खंड प्रसिद्ध झाला. भांडवलशाही कशी काम करते, नफा कसा तयार होतो, कामगारांचे शोषण कसे होते याचे सखोल विश्लेषण त्याने मांडले. "इतिहास म्हणजे वर्गसंघर्षाचा इतिहास आहे" हा त्याचा सिद्धांत होता. मार्क्सच्या विचारांवर रशियात १९१७ ची बोल्शेविक क्रांती झाली. लेनिन, माओ, कास्त्रो, चे गव्हेरा यांनी मार्क्सला गुरु मानले. चीन, क्युबा, व्हिएतनाम, पूर्व युरोप - एकेकाळी जगाच्या एक तृतीयांश लोकसंख्येवर मार्क्सवादी सरकारे होती, पण टीकाकार म्हणतात की त्याच्या नावावर झालेल्या राजवटींनी लाखो लोकांचे बळी घेतले. स्टॅलिनच्या रशियात, माओच्या चीनमध्ये, कंबोडियात पोल पॉटच्या राजवटीत मोठ्या प्रमाणावर कत्तली झाल्या. मार्क्सने हिंसेचे समर्थन केले नव्हते, पण त्याच्या विचारांचा अर्थ लावताना हुकूमशहांनी त्याचा वापर केला. सोव्हिएत युनियन कोसळून ३० वर्षे झाली. तरी २००८ च्या आर्थिक मंदीनंतर जगभरातील तरुण पुन्हा 'दास कॅपिटल' वाचू लागले. भांडवलशाहीतील विषमता, बेरोजगारी, हवामान बदल यावर मार्क्सचे विश्लेषण आजही लागू पडते असे अनेक अर्थतज्ज्ञ मानतात. ऑक्सफर्ड, हार्वर्डमध्ये त्याच्यावर अनेक अभ्यासक्रम आहेत. दास कॅपिटल (भाग १) हा त्यांचा उत्कृष्ट म्हणून प्रसिद्ध असलेला ग्रंथ होय. इंटरनॅशनल वर्किंग मेन्स असोसिएशन या संघटनेने कामगारांचा पवित्र असा ग्रंथ म्हणून या ग्रंथाचे वर्णन केलेले आहे. बर्लिन येथे १८६७ मध्ये हा ग्रंथ प्रथम प्रकाशित झाला आणि १८७३ मध्ये त्याची दुसरी आवृत्तीदेखील निघाली. मार्क्सने भाग दोन आणि तीन हेही लिहीले, परंतु त्यांचे संपादन करून एंगेल्सने मार्क्सच्या देहांतानंतर १८८५ आणि १८९४ मध्ये ते क्रमाने प्रसिद्ध केले. दरम्यान, मार्क्सने इंग्लिश भांडवलशाहीचे अवलोकन केले. ब्रिटिश कामगारवर्गाचे दैन्य व दुर्दशा मार्क्सने पाहिली आणि मोजली आणि त्यावरून भविष्यवाद काढला की या भांडवलशाहीच्या खासगी संपत्तीवर खिळा ठोकळा जात आहे आणि ज्यांनी लुटले ते लुटले जाणार आहेत. पीडीत जनतेला फार मोठा आशावादी दृष्टिकोन देण्यात मार्क्स हा यशस्वी झाला. १४ मार्च १८८३ मध्ये त्यांचे निधन झाले.

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## इंटिमेट हायजीनसाठी काही घरगुती हर्बल वॉश

सध्याच्या धावपळीच्या जीवनात आपण आपल्या शरीराच्या बाह्य स्वच्छतेकडे खूप लक्ष देतो, परंतु इंटिमेट हायजीन किंवा अंतर्गत स्वच्छतेकडे अनेकदा दुर्लक्ष होते. बाजारात मिळणारे बहुतांश इंटिमेट वॉश सुगंधी असले तरी त्यात केमिकल्स असतात.या केमिकल्समुळे आपल्या त्वचेचा नैसर्गिक पीएच समतोल बिघडू शकतो. ज्यामुळे खाज, जळजळ, पांढरे पाणी जाणे किंवा दुर्गंधी यांसारख्या समस्या उद्भवतात.



स्त्रियांच्या नाजूक त्वचेसाठी निसर्गाने आपल्याला अनेक प्रभावी औषधी वनस्पती दिल्या आहेत. या नैसर्गिक घटकांमध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात जे इन्फेक्शनपासून संरक्षण करतात. केमिकल्सला बाय-बाय म्हणून घरच्या घरी हर्बल वॉश बनवणे केवळ सुरक्षितच नाही, तर ते अत्यंत किफायतशीरदेखील आहे. जेव्हा आपण नैसर्गिक घटकांचा वापर करतो, तेव्हा त्वचेला कोणत्याही प्रकारची इजा होत नाही आणि आरोग्यही जपले जाते. आपण अशाच ७ प्रभावी हर्बल वॉशबद्दल पाहूया. जे आपल्याला दिवसभर फ्रेश आणि सुरक्षित ठेवतील.

न्यूट्रिशनिस्ट श्वेता शाह यांच्या मते इंटिमेट केअर ही फक्त गरज नसून त्याची आपण नियमितपणे काळजी घ्यायला हवी. स्वयंपाकघरातील काही घटक वापरुन आपण हा वॉश तयार करु शकतो. यात कोणतेही केमिकल्स नसल्यामुळे ते त्वचेसाठी अत्यंत सौम्य असतात. हा हर्बल वॉश कसा बनवायचा पाहूया. साहित्य : कडुनिंबाची पाने, तुळशीची पाने, हळद, जिरे, पाणी

कृती : एका पातेल्यात पाणी घेऊन ते चांगले उकळून घ्या. उकळत्या पाण्यात कडुनिंब, तुळस, हळद आणि जिरे घाला. सर्व घटकांचा अर्क पाण्यात नीट उतरल्यानंतर काही मिनिटे चांगले उकळा. पाणी पूर्णपणे थंड झाल्यानंतर गाळून घ्या. या हर्बल वॉशने इंटिमेट एरिया स्वच्छ करा. दिवसातून एकदा याचा वापर करु शकता. वापरल्यानंतर साध्या स्वच्छ पाण्याने तो भाग स्वच्छ करा.

फायदे : या वॉशमध्ये नैसर्गिक घटक असल्यामुळे संवेदनशील त्वचेसाठी फायदेशीर आहे. इंटिमेट एरियाची त्वचा अतिशय नाजूक असते. हर्बल वॉश या त्वचेवर सौम्यपणे काम करते, ज्यामुळे जळजळ किंवा कोरडेपणा येण्याची शक्यता कमी होते. कडुनिंब आणि हळद यामध्ये अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म असतात, जे बॅक्टेरिया कमी करण्यास मदत करतात. यामुळे दुर्गंधी, खाज आणि सौम्य जळजळ यांसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष १२, अंक ६१] मंगळवार, एप्रिल २८, २०२६/वैशाख ८, शके १९४८ [पृष्ठे ३१, किंमत : रुपये ९.००

## असाधारण क्रमांक १९१

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक–अ आणि एक–ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२, दिनांक २८ एप्रिल, २०२६.

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक–खाक्षेस–२०२५/प्र.क्र.५०/रस्ते–८. ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) तसेच कलम १५ च्या पोट–कलम (३) व कलम १७ द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस–२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते–८, दिनांक १३ मार्च २०२४ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, रेवस–रेड्डी सागरी महामार्ग (राज्य महामार्ग (विशेष) क्र. ५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा केला आहे) याच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जसे की, बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जमीन संपादित करण्याचा आपला उद्देश घोषित केलेला आहे; आणि **महाराष्ट्र शासकीय राजपत्रात** उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांच्याकडे, ज्यांच्या जमिनी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या **अनुसूचीमध्ये** समाविष्ट केल्या आहेत अशा उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तीकडून हरकती मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२५ (२०२५ चा महा. २८) याच्या कलम ३ तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (३) च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस–२०२४/ प्र.क्र.१२३/भाग–२/रस्ते–८, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार घोषणेच्या प्रसिद्धीसाठीचा कालावधी २८ एप्रिल, २०२६ पर्यंत आणखी एक वर्ष वाढविण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांनी, उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतल्यानंतर, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्याचे ठरविलेले आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, यासोबत जोडलेल्या **अनुसूचीच्या स्तंभ** (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेला जमीन धारण सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**
**जमिनीचे विवरण**

**तालुका : अलिबाग** **जिल्हा : रायगड**

| अनु.क्र. | गाव | सर्वे क्र. / गट क्र. | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | चौल | २७२१ पैकी | ०.११०६ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
**शासनाचे उप सचिव.**

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक–खाक्षेस–२०२५/प्र.क्र.५०/रस्ते–८. ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) तसेच कलम १५ च्या पोट–कलम (३) व कलम १७ द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस–२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते–८, दिनांक २१ ऑगस्ट २०२५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, रेवस रेड्डी सागरी महामार्ग (राज्य महामार्ग (विशेष) क्र. ५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा केला आहे) याच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जसे की, बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या **अनुसूचीमध्ये** नमूद केल्याप्रमाणे जमीन संपादित करण्याचा आपला उद्देश घोषित केलेला आहे; आणि **महाराष्ट्र शासकीय राजपत्रात** उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांच्याकडे, ज्यांच्या जमिनी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या **अनुसूचीमध्ये** समाविष्ट केल्या आहेत अशा उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तीकडून हरकती मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांनी, उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतल्यानंतर, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्याचे ठरविलेले आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ(२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेला जमीन धारण सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**
**जमिनीचे विवरण**

**तालुका : अलिबाग** **जिल्हा : रायगड**

| अनु.क्र. | गाव | सर्वे क्र. / गट क्र. | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रेवदंडा | ५/१ पैकी | ०.१२७० |
| २ | रेवदंडा | ५/२ पैकी | ०.१९२० |
| ३ | रेवदंडा | ७ पैकी | ०.१५१० |
| ४ | रेवदंडा | ९६/१ पैकी | ०.२३१० |
| ५ | रेवदंडा | ९६/२.पैकी | ०.१२२० |
| ६ | रेवदंडा | ९६/३ पैकी | ०.५२७० |
| ७ | रेवदंडा | ९७ पैकी | ०.३७६० |
| ८ | रेवदंडा | ९९ पैकी | ०.७७१० |
| ९ | रेवदंडा | १००अ/१/१ (१) अ पैकी | ०.१३६० |
| १० | रेवदंडा | १००अ/१/१ (१) ब पैकी | ०.०६७० |
| ११ | रेवदंडा | १०० अ/१/२ अ पैकी | ०.१३५० |
| १२ | रेवदंडा | १००अ/१/१/२ पैकी | ०.२३९० |
| १३ | रेवदंडा | १०० ब पैकी | ०.०१०० |
| १४ | रेवदंडा | १०१/२ अ पैकी | ०.११६० |
| १५ | रेवदंडा | १०१/२ ब पैकी | ०.०१०० |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**संदीप खलाटे,**
**शासनाचे उप सचिव.**

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम**

क्रमांक–खाक्षेस–२०२५/प्र.क्र.५०/रस्ते–८. ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) तसेच कलम १५ च्या पोट–कलम (३) व कलम १७ द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस–२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते–८, दिनांक १३ मार्च २०२४ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, रेवस रेड्डी सागरी महामार्ग (राज्य महामार्ग (विशेष) क्र. ५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा केला आहे) याच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जसे की, बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जमीन संपादित करण्याचा आपला उद्देश घोषित केलेला आहे; आणि **महाराष्ट्र शासकीय राजपत्रात** उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांच्याकडे, ज्यांच्या जमिनी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केल्या आहेत अशा उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तीकडून हरकती मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२५ (२०२५ चा महा. २८) याच्या कलम ३ तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (३) च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस–२०२४/प्र.क्र.१२३/भाग–२/रस्ते–८, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार घोषणेच्या प्रसिद्धीसाठीचा कालावधी २८ एप्रिल, २०२६ पर्यंत आणखी एक वर्ष वाढविण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांनी, उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट–कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतल्यानंतर, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्याचे ठरविलेले आहे;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट–कलम (१) द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ(२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेला जमीन धारण सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**
**जमिनीचे विवरण**

**तालुका : अलिबाग** **जिल्हा : रायगड**

| अनु.क्र. | गाव | सर्वे क्र. / गट क्र. | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | रांजणखार डावली | १/अ/५ पै | ०.०८४१ |
| २ | रांजणखार डावली | ३/अ/१ पै | ०.०१५२ |
| ३ | रांजणखार डावली | ३१/१ पै | ०.०२४४ |
| ४ | रांजणखार डावली | ३१/२ पै | ०.०७८३ |
| ५ | रांजणखार डावली | ३२/१ पै | ०.०७७२ |
| ६ | रांजणखार डावली | ३२/२ पै | ०.०७४३ |
| ७ | रांजणखार डावली | ३२/३ पै | ०.०९८० |
| ८ | रांजणखार डावली | ३२/४ पै | ०.११६३ |
| ९ | रांजणखार डावली | ३२/५ पे | ०.०५४७ |
| १० | रांजणखार डावली | ३३/१ पै | ०.१४२० |
| ११ | रांजणखार डावली | ३३/२ पै | ०.४१९७ |
| १२ | रांजणखार डावली | ३३/३ पै | ०.२५४६ |
| १३ | रांजणखार डावली | ३३/४ पै | ०.०९३५ |
| १४ | रांजणखार डावली | ३४/० पै | ०.१५५४ |
| १५ | रांजणखार डावली | ३५/१ पै | ०.११३२ |
| १६ | रांजणखार डावली | ३५/२ पै | ०.३००५ |
| १७ | रांजणखार डावली | ३५/३ पै | ०.१९६९ |
| १८ | रांजणखार डावली | ३५/४ पै | ०.०३६५ |
| १९ | रांजणखार डावली | ३५/५ पै | ०.०३३१ |
| २० | रांजणखार डावली | ४८/अ/२ पै | ०.०८१८ |
| २१ | रांजणखार डावली | ७७/२ पै | ०.२०४२ |
| २२ | रांजणखार डावली | ७७/३ पै | ०.११२४ |
| २३ | रांजणखार डावली | ७७/४ पै | ०.०८२१ |
| २४ | रांजणखार डावली | ७७/५ पै | ०.१५८७ |
| २५ | रांजणखार डावली | ७८/२ पै | ०.०१८२ |
| २६ | रांजणखार डावली | ७८/५ पै | ०.१५७६ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
**शासनाचे उप सचिव.**

### अधिसूचना

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक–खाक्षेस–२०२५/प्र.क्र.५०/रस्ते–८. ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ च्या पोट–कलम (२) तसेच कलम १५ च्या पोट–कलम (३) व कलम १७ द्वारे प्रदान केलेले अधिकार व याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस–२०२४/प्र.क्र.१२३/रस्ते–८, दिनांक १३ मार्च २०२४ (यात वापुढे जिचा निर्देश "उक्त

पान ७ वर...

# सिडकोचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

## परदेशातील नामांकित विद्यापीठांचे कॅम्पस आता नवी मुंबईत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**




नवी मुंबईतील करंजाडे येथे १०० हेक्टर क्षेत्रावर राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी 'एज्युसिटी' प्रकल्प उभारला जाणार असून यामुळे शहराची नवी ओळख निर्माण होईल. (संग्रहित छायाचित्र)

नवी मुंबई : परदेशातील नामांकित विद्यापीठांचे कॅम्पस एकाच ठिकाणी उभारण्याच्या उद्देशाने राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'एज्युसीटी' प्रकल्पाला नवी मुंबईत गती मिळाली असून करंजाडे येथे १०० हेक्टर जागेवर या प्रकल्पाची आखणी सुरू झाली आहे. या प्रकल्पामुळे परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातच आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध होणार असल्याने शिक्षण क्षेत्रात मोठा बदल अपेक्षित आहे.राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या 'एज्युसिटी'साठी सिडको मंडळाने करंजाडे येथील जमीन निश्चित केली आहे. यापूर्वी कुंडेवहाळ गावाजवळील जागेवर हा प्रकल्प उभारण्याचे नियोजन होते. मात्र करंजाडे येथील जमीन सपाट आणि विकासास अनुकूल असल्याने येथे पायाभूत सुविधा उभारणे सोपे जाईल, या कारणास्तव अंतिम निवड करण्यात आल्याची माहिती सिडकोच्या सूत्रांनी दिली.

हा प्रकल्प सुमारे १०० हेक्टर क्षेत्रात उभारला जाणार असून यात परदेशातील १० नामांकित विद्यापीठांना शिक्षण सेवा देण्याची संधी मिळणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर हा प्रकल्प पुढील तीन वर्षांत उभारला जात आहे. त्यामुळे करंजाडे आणि पुष्पकनोड परिसराचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या भागासह नवी मुंबईलाच 'शैक्षणिक शहर' अशी ओळख मिळण्याची शक्यता आहे.

सिडकोने मागील वर्षी मुंबईत झालेल्या भव्य कार्यक्रमात ॲबर्डीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी आणि इन्स्टिट्यूटो युरोपिओ दी डिझाईन या पाच विद्यापीठांना इरादापत्रे दिली आहेत. प्रत्येक विद्यापीठाला सुमारे १० एकर जागा देण्यात येणार असून सिडकोकडून रस्ते व इतर पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. भविष्यात देशातील मोठे गुंतवणूकदार या प्रकल्पात सहभागी होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्यानंतर त्याच्या परिसरात महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यावर राज्य सरकारचा भर आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना एज्युसिटी, मेडिसिटी व इंटिग्रेटेड लॉजिस्टिक पार्क या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी जागा मोकळी करण्यावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना आहेत. यासाठी दररोज सिडकोचे अतिक्रमण हटविण्याच्या मोहिमा सुरू आहेत.

> **१० पैकी ६ विद्यापीठांसोबत सामंजस्य करार झाले असून त्यांना युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनकडून इरादापत्रेही मिळाली आहेत. सध्या परदेशात शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या १०० पैकी केवळ आठ विद्यार्थ्यांनाच संधी मिळते; मात्र या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना देशातच थेट प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे नवी मुंबईची ओळख 'शैक्षणिक राजधानी' म्हणूनही निर्माण होईल.**
> **–विजय सिंघल,** व्यवस्थापकीय संचालक, सिडको

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

मुख्यमंत्री महोदयांच्या संकल्पनेतून २५० एकर जमिनीवर 'एज्युसिटी' प्रकल्प उभारण्याचे सिडकोचे नियोजन.

सुमारे १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित.

परदेशातील १० नामांकित शिक्षण संस्थांची विद्यापीठे नवी मुंबईतील एकाच ठिकाणी. देशातील हा पहिलाच उपक्रम.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर प्रकल्प.

# बनावट प्रमाणपत्राने रेल्वे तिकीट लाटण्याचा प्रयत्न

## खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्थानकावर बनावट कर्करोग प्रमाणपत्राच्या आधारे रेल्वे तिकीट सवलत मिळवण्याचा प्रकार उघडकीस आला असून खारघर पोलीस तपास करत आहेत. )




पनवेल कर्करोगी असल्याचे खोटे भासवून रेल्वे तिकीट सवलत मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवाशांकडून अधिक पैसे उकळून रेल्वे प्रशासनाची व शासनाची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

रेल्वे तिकीट काढून देणारी टोळी यामध्ये सक्रिय असल्याचे बोलले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, २३ एप्रिलला सायंकाळी सुमारे ६.१० वाजता पनवेल रेल्वे स्थानकातील तिकीट काउंटर क्रमांक २ येथे हा प्रकार घडला. आरोपींनी कर्करोगी रुग्णांसाठी मिळणाऱ्या रेल्वे सवलतीचा गैरफायदा घेण्यासाठी बनावट प्रमाणपत्र तयार केले. हे प्रमाणपत्र टाटा मेमोरियल सेंटरच्या अधिकृत कागदपत्रांसारखे भासवण्यात आले होते.

त्यावर संबंधित कर्मचाऱ्याची बनावट सही आणि रूग्णालयाचे बनावट शिक्के देखील मारण्यात आले होते. रेल्वे कर्मचा–याच्या सतर्कतेमुळे ही बाब उघडकीस आली. ३० एप्रिल २०२६ रोजी 'गोल्डन टेम्पल मेल' (गाडी क्रमांक १२९०३) मध्ये बांद्रा टर्मिनस ते अंबाला कॅन्ट या मार्गावर दोन प्रवाशांना कर्करोगी रुग्ण म्हणून दाखवून सवलतीचे तिकीट मिळवून देण्यात आले.

प्रत्यक्षात या प्रवाशांकडे चौकशी केल्यावर ते कर्करोगी नसतानाही त्यांच्याकडे बनावट प्रमाणपत्र आढळली. या प्रकरणी अनोळखी व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) व ३३६(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद फडतरे या प्रकरणाचा तपास करत असून आरोपींचा शोध सुरू आहे.

या प्रकारामुळे रेल्वे प्रशासनासह टाटा हॉस्पिटल व शासनाची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. अशा पद्धतीने मागील किती दिवस रूग्णालयाच्या नावाचे बनावट प्रमाणपत्र कितीवेळा वापरण्यात आले.

संबंधित प्रवाशांपर्यंत ही टोळी कशी पोहचते याची चौकशी करत आहे. कर्करोगी रूग्णांच्या नावावर अशापद्धतीने फसवणूक करण्याचा हा पहिलाच गुन्हा खारघर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. या गुन्हेगारांना पोलिसांनी कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात टोळीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# फुंडे विद्यालयाचे कला शाखेतील तीन विद्यार्थी उरण तालुक्यात प्रथम

**उरण : वार्ताहर**



उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयाने यंदाच्या एच.एस.सी. बोर्ड परीक्षेतील कला शाखेत उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्यात आपला ठसा उमटवला आहे. विद्यालयातील प्रथम तीन विद्यार्थ्यांनी उरण तालुक्यात अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावत विद्यालयाचा लौकिक उंचावला आहे.

विद्यालयातील भगत लक्ष्मी जगन्नाथ हिने ६०० पैकी ५०४ गुण (८४.००%) मिळवत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. साहू आचल केशरी हिने ४५३ गुण (७५.५०%) मिळवत द्वितीय क्रमांक, तर ससाणे सिद्धिका लक्ष्मण हिने ४५१ गुण (७५.१७%) मिळवत तृतीय क्रमांक मिळवला.

या उल्लेखनीय यशामुळे फुंडे गावासह संपूर्ण उरण तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची अथक मेहनत यांचा मोठा वाटा आहे.

विद्यालयाच्या या उज्ज्वल कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही असेच यश मिळवत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे, उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, पर्यवेक्षिका सुप्रिया पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर प्रा. किशोर पाटील तसेच कला विभागाचे शिक्षक प्रा. बाबूलाल पाटोळे, प्रा. हरिश्चंद्र हरड, प्रा. परशराम कदम, सविता म्हात्रे आणि प्रा. प्रमोद म्हात्रे यांनी अभिनंदन केले आहे.

# वाशीतील बांधकाम साईटवर होणाऱ्या अपघातांवर डॉ. राजेश पाटील यांनी वेधले प्रशासनाचे लक्ष

**नवी मुंबई : बातमीदार**



वाशी परिसरातील बांधकाम साइटवर वारंवार घडणाऱ्या अपघातांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भाजपा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील यांनी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे आणि नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांना निवेदन दिले आहे.

डॉ. पाटील यांनी निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, नुकत्याच 28 एप्रिल रोजी, मोहम्मद कामरान इब्राहिम खान (वय 20) या कामगाराचा 27 व्या मजल्यावरून पडून दुर्दैवी मृत्यू झाला. अशाच प्रकारची घटना यापूर्वी 4 मार्च रोजी देखील वाशीतील सेक्टर–9 प्लॉट क्र.8 येथे घडली होती, ज्यामध्ये पवनकुमार लखिचंद महतो (वय 21) या कामगाराचा मृत्यू झाला होता. ही अतिशय गंभीर बाब असून साइटवर कामगारांच्या अपघाती मृत्यूबाबत विकासक व कंत्राटदारावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा आणि सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणी करावी अशी मागणी डॉ. राजेश पाटील यांनी केली आहे. तसेच बांधकाम व्यावसायिक कामगार सुरक्षेच्या नियमांचे पालन करतात की नाही याची तपासणी करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, शहरातील सर्व चालू असलेल्या बांधकाम प्रकल्पांची सुरक्षा ऑडिट करून, सुरक्षा नियमांचे पालन होत असल्याची खात्री करावी, मृत कामगारांच्या कुटुंबियांना संबंधित विकासक आणि कंत्राटदारांकडून योग्य आर्थिक मदत मिळवून द्यावी, याही मागण्या त्यांनी निवेदनात केल्या आहेत. तसेच या गंभीर विषयाची तातडीने दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य माध्यमिक आणि उच्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता १२ वी (HSC) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून यावर्षी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने विज्ञान शाखेच्या १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. वाणिज्य शाखेतून कु. प्रेरणा सोमनाथ म्हात्रे ९३.१७ टक्के घेऊन प्रथम, कु. आरुशी प्रमोद पांडे ९१.६७ टक्के घेऊन व्दितीय तर कु. उमर मुआझाम शिवकर ९०.३३ टक्के घेऊन तृतीय आला आहे.विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये विद्यालयात कु. खनसा इरशाद अहमद चौधरी ८९.१७ टक्के घेऊन प्रथम, कु. आदम निसार अहमद पारकर ८६.८३ टक्के घेऊन व्दितीय तर कु. इफ्रा अब्दूल रहीम शेख ८४.३३ टक्के व कु. आयुशी अमलेंद्र कुमार सिंग ८४.३३ टक्के घेत तृतीय आल्या. प्राचार्या निशा नायर यांनी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे विशेष कौतुक करताना सांगितले की, हा निकाल आपल्या सर्वांच्या मेहनतीचे फलित आहे. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी समन्वयाने केलेल्या प्रयत्नांमुळे हे शक्य झाले. शाळेतील विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशामुळे विद्यालयात आनंदानचे वातावरण आहे. सदर यशाबद्दल लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर (चेअरमन) अरूणशेठ भगत (अध्यक्ष) वाय.टी.देशमुख (व्हाईस चेअरमन) संजय भगत (बोर्ड ऑफ डायरेक्टर ज. भ. शि. प्र. संस्था) डॉ. गडदे र (सचिव ज. भ. शि. प्र. संस्था) प्रभाकर जोशी यांनी कौतुक केले.

# सुकापूरजवळ वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुकापूर गावाजवळील बालाजी सिम्फनी येथे रोज होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे प्रवासी नागरिक हैराण झाले आहेत. वाहतूक कोंडीचा सामना रोजच करावा लागत असल्याने या ठिकाणाहून प्रवास कसा करावा असा प्रश्न त्यांना सतावतो.

सुकापुर गावाजवळ असलेल्या बालाजी सिम्फनी सोसायटीतील नागरिकांच्या वाहनांमुळे ही गर्दी होत असल्याचे बोलले जात आहे. संध्याकाळच्या वेळेस वाहने मोठ्या प्रमाणात बाहेर निघत असल्याने वाहतूक कोंडित एक तास निघून जातो. त्यात आणखी भर म्हणजे वाहतूक पोलीस असल्यानंतर ही वाहतूक कोंडी आणखीनच वाढते. वाहतूक पोलीस वाहतूक कोंडी सोडवायला आल्यानंतर मोठ्या प्रमाणात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात.

# महामार्गावरील वाहनांच्या आवाजाने वन्यजीवांच्या हालचालींवर परिणाम


**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील कर्नाळा पक्षी अभयारण्य येथे बुद्ध पौर्णिमेनिमित्त पार पडलेल्या वन्यजीव नोंदणी मोहिमेत यंदा एक वेगळाच मुद्दा समोर आला आहे. अभयारण्यालगत असलेल्या मुंबई–गोवा महामार्गवरील प्लास्टिक गतिरोधकांवरून वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे निर्माण होणाऱ्या सततच्या आवाजाने वन्यजीवांच्या हालचालींवर परिणाम होत असल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

१ मे रोजी झालेल्या या मोहिमेत वन्यजीवांची संख्या सव्वाशेवर पोहोचली असली, तरी या आवाजाचा वन्यजीवांवर होणारा परिणाम चिंतेचा विषय ठरत आहे.राज्यातील पहिले पक्षी अभयारण्य म्हणून ओळख असलेल्या कर्नाळा अभयारण्यात दरवर्षीप्रमाणे यंदाही २४ तासांच्या निरीक्षणातून वन्यजीवांची नोंद घेण्यात आली. मागील वर्षी ८२ वन्यजीवांची नोंद झाली होती. यंदा ही संख्या वाढल्याने जैवविविधतेत सकारात्मक वाढ दिसून आली. मात्र, वन्यजीवांच्या नैसर्गिक वर्तनात बदल होत असल्याची नोंद पक्षी निरीक्षकांनी केली आहे.

# गृहनिर्माण संस्थांना नवी मुंबई फेडरेशनचे ताळेबंद सादर करण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**



महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, नियम आणि उपविधी नुसार सहकारी वर्ष संपल्यावर ४५ दिवसाच्या आत मागील सहकारी वर्षाचे प्राप्ती आणि प्रदान विवरण पत्र, उत्पन्न आणि खर्च विवरण पत्र तसेच वर्ष अखेरच्या दिवसाचा ताळेबंद तयार करणे गृहनिर्माण संस्थाना बंधनकारक आहे, असे आवाहन नवी मुंबई हाउसिंग फेडरेशनने नवी मुंबईतील सोसायट्यांना केले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ८१ (१) (अ) नुसार ३१ जुलै पर्यंत लेखा परीक्षण करणे आवश्यक आहे. आदर्श उपविधीक्रमांक १४६ (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वार्षिक विवरण ३० सप्टेंबर पूर्वी निबंधकास सादर करणे अनिवार्य आहे. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेने नियुक्ती केलेल्या, राज्यशासनाने मान्यता दिलेल्या नामिकेतील लेखा परीक्षक किंवा लेखापरीक्षण करणाऱ्या व्यवसाय संस्थेचे नाव आणि त्याची लेखी संमती असलेले विवरण वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत सादर करणे बंधनकारक आहे.

लेखापरीक्षकाकडुन अहवाल आल्यानंतर संस्थेच्या सचिवाने "O" नमुन्यात दोष दुरुस्ती अहवालाचा मसुदा तयार करुन तो प्राप्त झाल्याच्या तारखेच्या लगत नंतर भरलेल्या व्यवस्थापक समिती पुढे मंजुरी साठी सादर करावा. समिती लेखा परीक्षण दुरुस्ती अहवाल निबंधकाकडे आणि वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे सादर करेल. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी किंवा तत्पूर्वी अधिनियमातील कलम ७५ (१) खाली तरतूद केल्याप्रमाणे भरवली पाहिजे. जर सभा विहित केलेल्या मुदतीत बोलाविण्यात कसूर करण्यात आली तर अधिनियमाच्या कलम ७५ (५) खाली निरर्थक ठरविण्यात येईल आणि कार्यकारी समितीवरकारवाई होऊ शकते. त्यामुळे सर्व गृहनिर्माण संस्थांनी संस्थेवर निबंधक कार्यालयाकडून कारवाई होऊ नये याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, नियम आणि आदर्श उपविधी नुसार लेखापरीक्षण आणि वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची गरज आहे.

दरम्यान, कोणत्याही गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना काही शंका असल्यास त्यांनी भास्कर म्हात्रे, सचिव – नवी मुंबई फेडरेशन यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन नवी मुंबई फेडरेशन द्वारे करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये उद्योगाभिमुख कौशल्य विकासासाठी भागीदारी

**पनवेल : प्रतिनिधी**



दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सहाय्याने कार्यरत सामाजिक विकास संस्था ईशान्य फाउंडेशनने महाराष्ट्रातील पनवेल येथील भोकरपाडा येथे प्रगत कौशल्य विकासासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारण्यासाठी नामटेक (NAMTECH) सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. नामटेक ही आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी स्थापन केलेल्या सेक्शन ८ कंपनीचा एकभाग असून, सध्या ती गुजरातमधील गांधीनगर येथे कौशल्य विद्यापीठ उभारण्याचे कामकरतआहे.'सेंटर ऑफ एक्सलन्स' स्थापन करण्याचा हा प्रकल्प दीपक फर्टिलायझर्सच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांचा भाग असून, रोजगारक्षमता वाढवणे आणि उद्योगसिद्ध मनुष्यबळ तयार करण्यासाठी भविष्याभिमुख कौशल्य विकास परिसंस्था उभारणे हा यामागील उद्देश आहे.

हा उपक्रम दीपक फर्टिलायझर्स चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर एस. सी. मेहता, तसेच ईशान्य फाउंडेशन मॅनेजिंग ट्रस्टी पारुल मेहता यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व मार्गदर्शनातून साकार झाला आहे. शिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.या तीन वर्षांच्या सहकार्याअंतर्गत, नामटेक (NAMTECH) ईशान्य फाउंडेशनला "सेंटर ऑफ एक्सलन्स" स्थापन व कार्यान्वित करण्यासाठी तांत्रिक सल्ला आणि अंमलबजावणीसाठी मदत करणार आहे. या उपक्रमाद्वारे बेरोजगार युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबरोबरच उद्योगात काम करणाऱ्या व्यक्तींसाठी कौशल्यवृद्धी आणि पुनःकौशल्यविकास कार्यक्रमदेखील राबविण्यात येणार आहेत.पनवेलमधील भोकरपाडा येथे जुन्या मुंबईपुणे महामार्गालगत दोन एकर जागेवर हे उत्कृष्टता केंद्र विकसित करण्यात येणार आहे. उत्पादन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील बदलत्या गरजा लक्षात घेऊन कौशल्य दरी कमी करणे, उत्पादकता वाढविणे आणि रोजगार क्षमतेत सुधारणा घडविणे हा या संस्थेचा उद्देश असेल.

या उत्कृष्टता केंद्रामध्ये उत्पादन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील प्राधान्यक्षेत्रे व रोजगार भूमिका निश्चित करण्यात येतील. तसेच विद्यार्थ्यांची मागणी आणि उद्योगाच्या गरजेनुसार प्रवेश क्षमतेचे नियोजन केले जाईल. आधुनिक वर्गखोल्या, प्रयोगशाळा, कार्यशाळा, नवोपक्रम केंद्रे, प्रशासकीय सुविधा, वसतिगृह, कॅफेटेरिया आणि आवश्यक पायाभूत सुविधा येथे उपलब्ध असतील. हा प्रकल्प अंदाजे ३५ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन असून, बांधकाम व टप्प्याटप्प्याने विकास नामटेकच्या तांत्रिक शिफारसी आणि जागा नियोजनानुसार करण्यात येईल. उद्योग भागीदारांच्या सहकार्याने अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि नवोपक्रम केंद्रे विकसित केली जातील.

या सामंजस्य करारावर ईशान्य फाउंडेशन तर्फे दीपक फर्टिलायझर्सचे प्रेसिडेंट कॉर्पोरेट गव्हर्नन्स नरेश पिनिसेट्टी आणि संचालक एम. पी. शिंदे यांनी तर नामटेक तर्फे महासंचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इब्राहिम हफीजूर रहमान यांनी स्वाक्षरी केली.

# हेटवणे जलबोगदा कामामुळे पाणी योजनांवर परिणाम; उपाययोजनेचे निर्देश





**पेण** : हेटवणे जल बोगदा कामांच्या अनुषंगाने ग्रामपंचायत बेलवडे हद्दीतील गावांच्या पाणी योजनांबाबत निर्माण झालेल्या विविध अडचणी संदर्भात नुकतीच प्रांत कार्यालय, पेण येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील अध्यक्षस्थानी होते. बैठकीस आमदार रविशेठ पाटील, प्रवीण पवार (प्रांत अधिकारी, पेण), पोतदार (कार्यकारी अभियंता, सिडको), राजभोय मॅडम, देशमुख मॅडम (उपअभियंता, ग्राम पाणी पुरवठा विभाग), उपसभापती संजय डंगर, तसेच मेघा कंपनीचे मुख्य ठेकेदार व प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीदरम्यान ग्रामपंचायत बेलवडे हद्दीतील गावांना पाणीपुरवठा योजनांबाबत भेडसावत असलेल्या समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी माजी खासदार धैर्यशील पाटील यांनी सिडको अधिकाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी तातडीने चर्चा करून संबंधित गावांच्या समस्या त्वरित मार्गी लावण्याबाबत कडक शब्दांत सक्त ताकीद दिली.



**पेण : नालंदा बुद्धविहार हमरापूर येथे उद्घाटन सोहळा रायगड जिल्हा परिषदेचे सभापती वैकुंठ पाटील यांच्या हस्ते झाला. नवीन वास्तूचा लोकार्पण सोहळा व बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापना करण्यात आली.**




## सावधान नोटीस

सदर नोटीसीने सर्वांना सावध करण्यात येते की, मौजे गिरवले ता. पनवेल जि. रायगड येथे खालील वर्णनाची जमिन मिळकत आहे.

**मौजे गिरवले ता. पनवेल**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ११४ | ४ | ०-८९-९० | ११.९ |
| ११६ | ० | ०-१९-०० | ३.७५ |
| ११४ | १ | ०-४१-५० | ९.०६ |
| १३१ | २ | ०-०७-९० | ०.८७ |

सदर जमिन मिळकतीच्या ७/१२ सदरी श्री. चंद्रकांत गणू भोमकर यांचे नांव लागले आहे. सदर जमिन मिळकतीमध्ये आमचे पक्षकारांचा कायदेशीर हिस्सा हक्क व अधिकार आहे. सदरचा कायदेशीर हिस्सा मिळणेसाठी आमचे पक्षकार हे योग्य ती कायदेशीर दिवाणी आणि अगर फौजदारी कारवाई करणार आहेत.

तरी सदरकामी वरील जमिन मिळकतीपैकी श्री. चंद्रकांत गणू भोमकर यांच्या हिश्याबाबत कोणीही त्यांचेसोबत कोणत्याही प्रकारे विकी अगर हस्तांतरणाबाबत कसलाही व्यवहार अगर करार केल्यास तो आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही व त्यांचेविरुद्धही कायदेशिर कारवाई करण्यात येईल असे सावध करणेत येते.

**सही/-**
**ॲड. जी. आर. कडव**
**कार्या. १३९, मुनिसिपल कॉम्प्लेक्स, ठाणा नाका रोड, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६**

## जाहीर नोटीस

सर्व लोकास या जाहीर नोटीसीने असे कळवीण्यात येते की, मौजे लोधिवली, ता. खालापूर जिल्हा. रायगड येथील खालील प्रमाने हक्क नोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे आशिलांनी संबंधित कब्जेदार श्री. प्रभाकर बाबुराव कंटाबळे यांचेकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

| अ.कं. | सर्व्हे नं | जुना सर्व्हे नं | क्षेत्रफळ. आर चौ मी | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | १/३ | ४/५ | ४-९०-०० | ४०.९० |

सबब सदर मिळकतीचा अगर कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (२१) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे खाली नमुद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहाणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल हे सर्व लोकांस कळावे.

**ठिकाण : रिस**
**दिनांक: ०४/०५/२०२६**

sd/-
Adv. SACHIN R. CHALKE
(B.A.LL.B.)
Mah./4413/2012
Office: Gokul Nagari Building, 1st Floor, Room No. 107 Village Rees, Tal. Khalapur, Dist. Raigad, Maharashtra, Pin-410 222, Mobile: 8600990469

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी खालापूर, यांचे न्यायालयात तालुका खालापूर, जि. रायगड**

दुरध्वनी क्रमांक ०२१९२/२७५०४८ ईमेल- tahasil. khalapur3@gmail.com

क्र. जन्म/रजि/एसआर ४८/२०२५,

१) श्रीम. सुजाता हनुमंत नारमुनी
रा. मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड — वादी

**विरुध्द**

१) निबंधक, जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत वासंबे, ता. खालापूर, जि. रायगड — प्रतिवादी

**विषयः- जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार**

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्रीम. सुजाता हनुमंत नारमुनी, रा. मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड (अपिलार्थी) यांच्या ननंद जन्म् श्रीम. गौरी लक्ष्मण नारमुनी दि. १२/०८/१९८३ रोजी मौजे मोहोपाडा, ता. खालापूर येथे झाला आहे. सदर जन्माची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे जन्माची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त् न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील आदेश करणेत येईल याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आज दि.०९/०२/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

**ठिकाण:- खालापूर**
**दिनांक:- ०९/०२/२०२६**

**सही/-**
**(अभय चव्हाण)**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार खालापूर**


**पान ५ वरुन...**

अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, रेवस-रेड्डी सागरी महामार्ग (राज्य महामार्ग (विशेष) क्र. ५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा केला आहे) याच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जसे की, बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जमीन संपादित करण्याचा आपला उद्देश घोषित केलेला आहे; आणि महाराष्ट्र शासकीय राजपत्रात उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांच्याकडे, ज्यांच्या जमिनी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केल्या आहेत अशा उक्त जमिनीत हितसंबंग असलेल्या व्यक्तीकडून हरकती मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग (सुधारणा) अधिनियम, २०२५ (२०२५ चा महा. २८) वाच्या कलम ३ तसेच उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) च्या दुसऱ्या आणि तिसऱ्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/भाग-२/रस्ते-८, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यकतेनुसार घोषणेच्या प्रसिद्धीसाठीचा कालावधी २८ एप्रिल, २०२६ पर्यंत आणखी एक वर्ष वाढविण्यात येत आहे:

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांनी, उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतल्यानंतर, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्याचे ठरविलेले आहे:

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेले अधिकार व याचाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या बाबतीत त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेला जमीन धारण सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**
**जमिनीचे विवरण**

**तालुका : मुरुड** **जिल्हा : रायगड**

| अनु.क्र. | गाव | सर्वे क्र./गट क्र. | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | टोकेखार | ३२ पैकी | ०.१५४२ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
**शासनाचे उप सचिव.**

**अधिसूचना**

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम.**

क्रमांक-खाक्षेस-२०२५/प्र.क्र.५०/रस्ते-८. ज्याअर्थी, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १५ च्या पोट-कलम (२) तसेच कलम १५ च्या पोट-कलम (३) व कलम १७ द्वारे प्रदान केलेले अधिकार व याचाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. खाक्षेस-२०२४/प्र.क्र.१२३/ रस्ते-८, दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा केला आहे) याद्वारे, रेवस-रेड्डी सागरी महामार्ग (राज्य महामार्ग (विशेष) क्र.५) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त महामार्ग" असा केला आहे) याच्या सार्वजनिक प्रयोजनासाठी जसे की, बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जमीन संपादित करण्याचा आपला उद्देश घोषित केलेला आहे; आणि महाराष्ट्र शासकीय राजपत्रात उक्त अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी अलिबाग, जिल्हा रायगड यांच्याकडे, ज्यांच्या जमिनी उक्त अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये समाविष्ट केल्या आहेत अशा उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तीकडून हरकती मागविलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी आलिबाग, जिल्हा रायगड यांनी, उक्त जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त झालेल्या हरकती विचारात घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला आहे,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, उक्त अहवाल विचारात घेतल्यानंतर, या अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली जमीन, उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्याचे ठरविलेले आहे,

त्याअर्थी आता, महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५) याच्या कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेले अधिकार च याचाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, वासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ(२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांच्या वाचतीत त्यातील स्तंभ (३) मध्ये नमूद केलेला जमीन धारण सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक, अनुसूचीच्या स्तंभ (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र उक्त महामार्गाचे बांधकाम, परिरक्षण, व्यवस्थापन किंवा कार्यान्वयन यांसाठी संपादित करण्यात येईल असे घोषित करीत आहे.

**अनुसूची**
**जमिनीचे विवरण**

**तालुका : मुरुड** **जिल्हा : रायगड**

| अनु.क्र. | गाव | सर्वे क्र. / गट क्र. | क्षेत्र (हेक्टर आर) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | सावली | २४३ पैकी | ०.०१४० |
| २ | सावली | २३७ पैकी | ०.०११२ |
| ३ | सावली | १८९ पैकी | ०.०५१६ |
| ४ | सावली | १८० पैकी | ०.२१९५ |
| ५ | सावली | १८२ पैकी | ०.००४९ |
| ६ | सावली | १८४ पैकी | ०.०२४१ |
| ७ | सावली | १८६ पैकी | ०.०३१६ |
| ८ | सावली | १८७ पैकी | ०.००५७ |
| ९ | सावली | १७९ पैकी | ०,०६०७ |
| १० | सावली | १८८ पैकी | ०.११४३ |
| ११ | सावली | १९० पैकी | ०.०९८० |
| १२ | सावली | १४० पैकी | ०,०२१२ |
| १३ | सावली | १९१ पैकी | ०.०५७८ |
| १४ | सावली | १९२ पैकी | ०.०१५२ |
| १५ | सावली | १२३ पैकी | ०.४२८२ |
| १६ | सावली | ११० पैकी | ०.०३५६ |
| १७ | सावली | १२४ पैकी | ०.०१४३ |
| १८ | सावली | १२२ पैकी | ०.०४७५ |
| १९ | सावली | १२० पैकी | ०,०००२ |
| २० | सावली | ११९ पैकी | ०.००२८ |
| २१ | सावली | ३९६ पैकी | ०,०५३० |
| २२ | सावली | ११४ पैकी | ०.०२१४ |
| २३ | सावली | १११ पैकी | ०.०३०० |
| २४ | सावली | ११२ पैकी | ०.०३२६ |
| २५ | सावली | १०३ पैकी | ०.१४२१ |
| २६ | सावली | ११३ पैकी | ०,०३२७ |
| २७ | सावली | १०६ पैकी | ०.०१३७ |
| २८ | सावली | १०२ पैकी | ०.१४९३ |
| २९ | सावली | २४४ पैकी | ०.०००३ |
| ३० | सावली | १०५ पैकी | ०,००९८ |
| ३१ | सावली | १०४ पैकी | ०.००८१ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संदीप खलाटे,**
**शासनाचे उप सचिव.**

**रायगड**
**दिनांक : ०४/०५/२०२६**

**क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१९/५६२/२०२६**

# अखेरच्या षटकात गुजरातचा रोमांचक विजय

## पंजाबचा सलग दुसरा पराभव

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्सने अखेरच्या षटकात टेबल टॉपर पंजाब किंग्सवर ४ विकेट्सने रोमांचक विजय मिळवला. या विजयासह आता गुजरात टायटन्स संघाचेही १२ गुण झाले आहेत, पण १३ गुणांसह पंजाब किंग्सचा संघ अजूनही गुणतालिकेत पहिल्या स्थानी आहे. पंजाबला प्लेऑफ गाठण्यासाठी फक्त दोन सामने जिंकण्याची गरज आहे. पण प्लेऑफच्या उंबरठ्यावर असताना पंजाबने गेले दोन सामने गमावले आहेत. पंजाबने प्रथम फलंदाजी करताना १६४ धावांचं आव्हान दिलं होतं, गुजरातने हे आव्हान १९.४ षटकांत गाठलं.



गुजरात टायटन्सला अखेरच्या २ षटकांत म्हणजेच १२ चेंडूत विजयासाठी १७ धावांची गरज होती. अर्शदीप १९वं षटक टाकण्यासाठी आला. अर्शदीपने पहिल्या चार चेंडूवर ५ धावा दिल्या आणि पाचव्या चेंडूवर जेसन होल्डरला बाद करत संघाला महत्त्वाची विकेट मिळवून दिली. यासह आता अखेरच्या षटकात गुजरातला विजयासाठी ११ धावांची गरज होती. मार्कस स्टॉयनिसला अखेरचं षटक टाकण्याची जबाबदारी देण्यात आली. त्याने पहिला चेंडू वाईड टाकला, यानंतर पहिल्या लीगल चेंडूवर यॉर्कर चुकल्याने अरशद खानने चौकार लगावला. यानंतर अरशदने मोठा फटका खेळला, पण सूर्यांश झेल टिपू शकला नाही आणि तितक्यात दोन धावा घेतल्या. चौथा चेंडू डॉट बॉल राहिला. यासह ३ चेंडूंत ४ धावांची गरज होती, चौथा चेंडू यॉर्कर टाकला आणि चेंडू टोलवून अरशद एक धाव घेण्यासाठी धावला आणि स्टॉयनिस त्याला धावबाद करण्यात अपयशी ठरला. दुसऱ्या चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरने षटकार लगावत संघाला शानदार विजय मिळवून दिला.

पंजाबने दिलेल्या १६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातची सुरूवात चांगली झाली. पण शुबमन गिल लवकर बाद झाला. गिल ५ धावांवर बाद झाल्यानंतर साई सुदर्शनने ४१ चेंडूत ५ चौकार व एका षटकारासह ५७ धावांची खेळी केली. तर जोस बटलर २६ धावा करत बाद झाला. निशांत सिंधूने १५ धावांचं योगदान दिलं. वॉशिंग्टन सुंदरने अखेरच्या षटकापर्यंत सावध खेळी करत कायम होता आणि संघाला गरज असताना त्याने मार्कस स्टॉयनिसच्या अखेरच्या षटकात षटकार खेचत संघाला विजय मिळवून देत माघारी परतला.

पंजाबच्या गोलंदाजांनीदेखील या सामन्यात सावध गोलंदाजी केली. विजयकुमार वैशाकने २ विकेट्स, तर अर्शदीप सिंग, मार्को यान्सन आणि मार्कस स्टॉयनिस यांनी १-१ विकेट्स घेतल्या. गुजरात टायटन्सने सामन्याची नाणेफेक जिंकत पंजाबला फलंदाजीसाठी पाचारण केले. मोहम्मद सिराजने गोलंदाजीची दणक्यात सुरूवात करीत पहिल्याच षटकात प्रियांश आर्य आणि कुपर कॉनोलीला बाद करीत पंजाबला मोठा धक्का दिला.

# हैदराबाद घरच्या मैदानावर पराभूत

## कोलकाता नाईट रायडर्सने नमवले

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ च्या ४५ व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने सनरायझर्स हैदराबादचा दणदणीत पराभव केला. हा सामना हैदराबादमधील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला गेला, परंतु हैदराबादला घरच्या मैदानावर पराभवाला सामोरे जावे लागले. यामुळे सनरायझर्स हैदराबादची सलग पाच सामन्यांची विजयी मालिका संपुष्टात आली. दरम्यान, कोलकाता नाईट रायडर्सने विजयांची हॅट्ट्रिक नोंदवली. मागील सहा सामन्यांमध्ये विजयाविना असलेला केकेआर जोरदार पुनरागमन करीत आहे.



या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु संपूर्ण डावात त्यांच्या विकेट्स पडत गेल्या. संघ १९ षटकांत १६५ धावांवर सर्वबाद झाला. अभिषेक शर्मा केवळ १५ धावांवर बाद झाला. त्यानंतर ट्रॅव्हिस हेडने आक्रमक खेळी करत २८ चेंडूंमध्ये ६१ धावा केल्या. इशान किशनसोबत मिळून त्याने संघाची धावसंख्या केवळ ८.५ षटकांत १०५ पर्यंत पोहोचवली, पण त्यानंतर डाव पूर्णपणे कोलमडला. संघाने आपल्या शेवटच्या नऊ विकेट्स केवळ ६० धावांत गमावल्या, ज्यामुळे हैदराबादला केवळ १६५ धावांवर समाधान मानावे लागले. कोलकाता नाईट रायडर्सकडून वरुण चक्रवर्तीने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या. सुनील नरेन आणि कार्तिक त्यागी यांनी प्रत्येकी दोन फलंदाजांना बाद केले. वैभव अरोरा, कॅमेरॉन ग्रीन आणि अनुकूल रॉय यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

लक्ष्याचा पाठलाग करताना केकेआरने दमदार सुरुवात केली. फिन ॲलनने १३ चेंडूंमध्ये २९ धावा केल्या, पण तो पॅट कमिन्सच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्यानंतर अजिंक्य रहाणे आणि अंगक्रिश रघुवंशी यांनी सावध खेळ करत संघाला विजयाच्या जवळ पोहचवले.

# रुद्र शिंदेचा महाराष्ट्र राज्य यू२० गटात नवा विक्रम

**पनवेल : वार्ताहर**

रुद्र सचिन शिंदे याने दिनांक २४ ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान राष्ट्रीय ज्युनियर U२० ॲथलेटिक्स फेडरेशन चॅम्पियनशिप २०२६, बंगळुरू येथे आयोजित स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. त्याने २०० मीटर शर्यतीत २१.२६ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवत कांस्य पदक जिंकले आणि महाराष्ट्र राज्य U२० गटात नवा विक्रम प्रस्थापित केला.



१०० मीटर शर्यतीत १०.५९ सेकंदांची वैयक्तिक सर्वोत्तम वेळ नोंदवत ६वे स्थान मिळवले, ज्यातून राष्ट्रीय स्तरावरील त्याची सातत्यपूर्ण कामगिरी अधोरेखित होते. या उल्लेखनीय कामगिरीमुळे रुद्रची ज्युनियर आशियाई ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ साठी निवड झाली असून ही स्पर्धा हाँगकाँग येथे २८ ते ३१ मे २०२६ दरम्यान होणार आहे. या स्पर्धेत २०० मीटर आणि ४१०० मीटर रिलेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे, जे त्याच्या क्रीडा प्रवासातील एक अभिमानास्पद आणि महत्त्वपूर्ण पाऊल आहे. रुद्र शिंदेची ॲथलेटिक्स कारकीर्द पनवेलमधून स्नेहल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली २०२१ मध्ये सुरू झाली. अल्पावधीतच रुद्रने जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय पातळीवर अनेक मेडल संपादीत केली. पुढील शिक्षणासाठी त्याने वाशी येथील फादर ॲग्नेल मल्टीपर्पज स्कूल आणि ज्युनियर कॉलेज येथे ॲडमिशन घेतले. फादर ॲग्नेलमध्ये शिक्षण घेत असताना श्रीनिवास गुप्ता यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने स्टेट आणि राष्ट्रीय पातळीवर यश संपादीत केले. यात ज्युनियर राष्ट्रीय ( भुवनेश्वर), स्कूल नॅशनल ( रांची), खेलो इंडीया गेम्स (बिहार) यात त्याने सहा नॅशनल मेडल पटकावले. पनवेलच्या मातीतून सुरू झालेला हा त्याचा प्रवास आता जागतिक पातळीवर पोहचला आहे.

# अष्टपैलू सूर्यांश शेडगे पंजाब किंग्ससाठी ठरला तारणहार


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ च्या हंगामात गुणतालिकेत पहिल्या स्थानी असलेल्या पंजाब किंग्सने सातत्यपूर्ण चांगली कामगिरी केली आहे. पंजाबची फलंदाजी इतकी मजबूत आहे की अनेक खेळाडूंना फारशा संधी मिळाल्या नाहीत. मात्र, या हंगामात जेव्हा संघाची फलंदाजी पहिल्यांदाच डगमगली, तेव्हा एका नवोदित क्रिकेटपटूने पुढे येत संघाचा डाव सावरला. हा खेळाडू होता अष्टपैलू सूर्यांश शेडगे, ज्याने गुजरात टायटन्सविरुद्ध धमाकेदार अर्धशतक झळकावलं.

अहमदाबादमध्ये गुजरात टायटन्सविरुद्धच्या या सामन्यात पंजाब किंग्सने प्रथम फलंदाजी केली. या हंगामात आतापर्यंत संघाच्या आघाडीच्या फलंदाजांनी गोलंदाजांची सातत्याने धुलाई करत स्फोटक सुरुवात करून दिली आहे. पॉवरप्लेमध्ये संघाला रोखणं कठीण जात असताना गुजरातच्या वेगवान गोलंदाजांनी यावेळी चित्रच पालटून केवळ ४७ धावांत संघाच्या निम्म्या फलंदाजांना बाद केलं. यानंतर आलेल्या सूर्यांश शेडगेने संघाला लढाऊ धावसंख्या उभारण्यात मोठी भूमिका बजावली.

पंजाबचा २३ वर्षीय अनकॅप्ड फलंदाज सूर्यांश शेडगेने गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्यात संघाला संकटातून बाहेर काढत शानदार कामगिरी केली. त्याने अवघ्या २४ चेंडूत अर्धशतक झळकावत डाव सावरला. त्याच्या खेळीचा खास क्षण १४व्या षटकात पाहायला मिळाला, जेव्हा त्याने मानव सुतारच्या एका षटकात तब्बल २६ धावा काढल्या. ३ षटकार आणि २ चौकारांची आतिषबाजी करत त्याने संघाला १०० धावांचा पल्ला पार करून दिला. शेवटी शेडगेने २९ चेंडूंत ५७ धावा करीत पराभवाच्या उंबरठ्यावर असलेल्या संघाला लढण्याची संधी मिळवून दिली.

# पॉवेलचा एकहाती झेल पाहून फॅन्सही अवाक्



**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ हंगामात कोलकाता नाईट रायडर्सचा रोव्हमन पॉवेलने ऐतिहासिक कामगिरी केली. सनरायझर्सचा फलंदाज हेनरिक क्लासेन क्रीजवर होता. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर क्लासेनने लाँग-ऑनच्या दिशेने एक उंच फटका मारला. रिंकूला तो पकडता आला नाही.

पुढच्याच चेंडूवर चौकार मारला, पण सलग तिसऱ्या चेंडूवर उंच फटका मारण्याची चूक घातक ठरली. यावेळी त्याने ग्रीनच्या गोलंदाजीवर फ्लिक शॉटचा प्रयत्न केला, पण डीप मिडविकेटवर असलेल्या रोव्हमन पॉवेलने धावत एकहाती सनसनाटी झेल घेतला. या झेलने सर्वांनाच आश्चर्यचकित केले.

# आयपीएलच्या गुणतालिकेत आता मोठा उलटफेर

## टॉप ४साठी पाच संघांमध्ये लढत; मुंबई इंडियन्स बाहेर?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेत आतापर्यंत झालेल्या सामन्यांमध्ये एकापेक्षा एक रोमांचक सामने पाहायला मिळाले आहेत. रविवारी डबल हेडर सामन्यांचा थरार रंगला. दुसऱ्या सामन्यात गुजरात टायटन्स संघाचा सामना पंजाब किंग्ज संघाविरुद्ध रंगला. या सामन्यातील शेवटच्या चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरने षटकार मारला आणि गुजरात टायटन्स संघाला विजय मिळवून दिला. पण या विजयानंतर गुणतालिकेतचं समीकरण आणखी किचकट झालं आहे.

रविवारी डबल हेडर सामन्यांचा थरार पार पडला. पहिल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने सनरायझर्स हैदराबादवर ७ गडी राखून विजय मिळवला. स्पर्धेतून बाहेर पडण्याच्या वाटेवर असलेल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाने दाखवून दिलं की आम्ही अजूनही स्पर्धेत टिकून आहोत. त्यानंतर दुसऱ्या सामन्यात गुजरात टायटन्सने पंजाब किंग्जवर दमदार विजय मिळवला. आधी पंजाबचा संघ खूप पुढे होता. पण लागोपाठ सामने गमावल्यानंतर पंजाबचा संघ १३ गुणांसह पहिल्या स्थानी कायम आहे, पण इतर संघ पंजाबच्या खूप जवळ पोहोचले आहेत. मुख्य बाब म्हणजे ४ संघ असे आहेत ज्यांनी आतापर्यंत १२ गुणांची कमाई केली आहे. सनरायझर्स हैदराबाद, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, राजस्थान रॉयल्स आणि आता गुजरात टायटन्स या संघांनी प्रत्येकी १२-१२ गुणांची कमाई केली आहे. आधी पंजाब किंग्ज संघ खूप पुढे होता, पण आता या ४ संघांपैकी कुठलाही संघ नंबर १ स्थानी जाऊ शकतो.

गुणतालिकेत मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्सचा संघ गुणतालिकेत सर्वात शेवटी आहे. हे दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीतून जवळजवळ बाहेर पडले आहेत. चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांनी देखील ८-८ गुणांची कमाई केली आहे. त्यामुळे हे संघदेखील प्लेऑफच्या शर्यतीत टिकून आहेत. तर कोलकाता नाईट रायडर्स संघाने आतापर्यंत ७ गुणांची कमाई केली आहे. आता कोणते ४ संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

# ‘गर्लफ्रेंड कल्चर’ला ब्रेक

## बीसीसीआय कारवाईच्या तयारीत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयने खेळाडूंच्या पत्नी व कुटुंबीयांच्या विदेश दौऱ्याबाबत काही नियम तयार केले होते. आता आयपीएलदरम्यानही बीसीसीआय अशीच कारवाई करण्याच्या तयारीत आहे. आयपीएल स्पर्धेदरम्यान अनेक खेळाडू आपल्या गर्लफ्रेंड्सबरोबर एकत्र प्रवास करताना दिसतात. इतकंच नव्हे तर टीम हॉटेलमध्येही एकत्र असतात. पण आता बीसीसीआय यावरदेखील कडक निर्बंध घालणार असल्याची माहिती समोर आली आहे. आयपीएलदरम्यान खेळाडूंना आता गर्लफ्रेंडबरोबर फिरण्याबाबत बीसीसीआय लवकरच नवी नियमावली जाहीर करणार आहे.



दरम्यान, भ्रष्टाचाराची संभाव्य प्रकरणे टाळण्यासाठी हा निर्णय घेतला जाऊ शकतो. काही क्रिकेटपटूंच्या जोडीदार बेटिंग ॲप्ससाठी काम करीत असल्याची माहिती नुकतीच समोर आली आहे, ज्यामुळे बीसीसीआयच्या भुवया उंचावल्या आहेत.

आता यापुढील आयपीएलपूर्वी स्पर्धेदरम्यान क्रिकेटपटूंचं राहण्याचं ठिकाण, प्रवास आणि त्यांच्या गर्लफ्रेंड्ससोबतच्या भेटीगाठींबाबत काही नियम निश्चित केले जातील.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com